पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

स्वातंत्र्यदिन चिरायू होवो...

अकोला • वर्ष १६ • अंक ३९ • शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

कृषी विद्यापीठाच्या नियंत्रकाचा अहवाल सिटी न्यूज सुपरफास्ट जवळ

# अकोला कृषी विद्यापीठात कोट्यवधींचा 'झोल'!

## महाघोटाळा थकीत देयकांच्या नावाखाली बोगस बिलबाजीचा घोटाळा उघड



प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या सहयोगी अधिष्ठाता कार्यालयात प्रशासकीय मनमानी आणि वित्तीय भ्रष्टाचाराचा भयानक प्रकार समोर आला आहे. कंत्राटदार संतोष एम. म्हातारमारे यांच्या कथित थकीत देयकांच्या चौकशी अहवालातून विद्यापीठातील 'पांढरपेशा' भ्रष्टाचाराचे वस्त्रहरण झाले असून, नियम धाब्यावर बसवून दुबार बिल काढणे, बनावट कागदपत्रे उभी करणे आणि सरकारी तिजोरीवर दरोडा टाकण्याचा गंभीर कट उघडकीस आला आहे. या संपुर्ण प्रकरणातील नियंत्रकांचा अहवालाची कॉपी सिटी न्यूज सुपरफास्ट जवळ आली आहे. या महाघोटाळ्यात कंत्राटदारासोबत विद्यापीठातील कोणते बडे मासे सहभागी आहेत? केवळ कागदी चौकशीचा खेळ न थांबवता, या प्रकरणातील दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून कडक कारवाई होणार की यावरही पडदा टाकला जाणार का, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. सिटी न्यूज सुपरफास्ट जवळ अहवालाची कॉपी येऊ शकते तर एम आय डी सी पोलिसांजवळ ती का येत नाही असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. अकोला पोलिस या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ का करत आहे की विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न होत आहे असा प्रश्न उपस्थित होतो.

### सरकारी तिजोरीवर दरोडा

**१) एकच काम, दोनदा बिलं !**

सन २०१९-२० मध्ये फर्निचर पॉलिशिंग, स्टेशनरी खरेदी आणि शेतात माती पुरवठा करण्याच्या नावाखाली लाटलेली देयके ही दुबार अदा करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

**२) 'गायब' नस्ती आणि संशयास्पद व्यवहार:**

झाडे कटाई मशीन (१६,०००), फवारणी पंप (५,६००), सॅनिटायझर व गोदरेज लॉक (९,५२०) आणि बोअरवेल पंप (१८,०००) या कामांच्या मूळ फायलीच कार्यालयातून रहस्यमयरित्या गायब करण्यात आल्या आहेत.

**३) लॉन टेनिस कोर्टाच्या नावाखाली रक्कम लाटली**

लॉन टेनिस कोर्टाच्या कामापोटी तब्बल २,८८,००० चे देयक ३१ मार्च २०२३ रोजीच अदा करण्यात आले असतानाही, याच कामासाठी पुन्हा देयकाची मागणी करून शासकीय निधीवर डल्ला मारण्याचा उघड प्रयत्न झाला.

**४) टेंडर प्रक्रियेला 'खड्डयात' घातले:**

'जेम' पोर्टल आणि शासन निर्णयानुसार पारदर्शक निविदा प्रक्रिया राबवणे बंधनकारक असताना, या नियमांना केराची टोपली दाखवण्यात आली. कोणत्याही तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेशिवाय परस्पर नियमबाह्य कामे दाखवण्यात आली.

**५) कामाचा पत्ता नाही, बिल मात्र तयार !**

कंत्राटदाराच्या बिलांवर कामाचे मूळ नाव, ठिकाण किंवा डिलिव्हरी मेमोचा कोणताही उल्लेख नाही. मोजमाप पुस्तकाचा पत्ता नसताना ही बिले कुणाच्या मेहेरबानीने पास केली जात होती, असा जळजळीत सवाल आता उपस्थित होत आहे.

# महाराष्ट्र कायमच एक नंबरवर राहील:मुख्यमंत्री

## शरद पवारांच्या संतापावर मुख्यमंत्री फडणवीसांचे उत्तर

प्रतिनिधी १४ ऑगस्ट



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोद यांच्या नेतृत्वात सुदैवाने संपूर्ण माहिती ही पारदर्शीपणे संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आपण कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या संकेतस्थळावर गेलात तर तेथे आपल्याला संपूर्ण माहिती प्राप्त होऊ शकते. ही माहिती देशातील प्रत्येक नागरिक, प्रत्येक माध्यमे पाहू शकतात. मला सांगताना आनंद होतो की, छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र क्रमांक १ वर होता आणि कायम क्रमांक १ वरच राहील,' असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

चाकण एमआयडीसीतील कंपन्यांचे वाहतूक कोंडीमुळे होणारे स्थलांतर आणि राज्यातील ३६ हजारांहून अधिक कंपन्या बंद पडल्याची माहिती समोर आल्यानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी चिंता व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांना सविस्तर पत्र लिहीत सरकारची बाजू मांडली आहे. 'संसदेतील खासदार राजाभाऊ वाजे यांच्या एका प्रश्नाच्या उत्तरात काही माहिती केंद्र सरकारकडून देण्यात आली. राज्यातील ३६ हजार २११ कंपन्या बंद झाल्या वगैरे. त्यानंतर काही नवख्या नेत्यांनी त्यासंदर्भात सोयीचा अर्थ काढून समाजमाध्यमांवर पोस्ट केल्या आणि काही माध्यमांनी त्याच्या बातम्या केल्या. पण, आपण कायम महाराष्ट्रहिताचा विचार करणारे सुजाण आणि ज्येष्ठ नेते आहात, त्यामुळे आपल्या मनात कोणता गैरसमज राहू नये, म्हणून विस्ताराने याबाबत खुलासा करत आहे,' असं म्हणत मुख्यमंत्र्यांनी सविस्तरपणे स्पष्टीकरण दिलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योगधंद्यांच्या स्थितीबाबत माहिती देताना म्हटलं आहे की, 'ज्या कंपन्या बंद होतात, त्यातील ७६ टक्के या डिफंक्ट कंपनी असतात. डिफंक्ट म्हणजे डिसफंक्शनल, म्हणजे ज्या कधी सुरूच झाल्या नाहीत. आता 'संसदेत विचारला प्रश्न आणि त्याचे उत्तर' किंवा 'माहिती अधिकारात विचारलेला प्रश्न आणि त्याचे उत्तर' याचे एक प्रारुप ठरलेले असते. त्या प्रश्नावर सभागृहात चर्चा झाली, तरच इतर तपशील मिळू शकतो.




# अकोल्यात स्वातंत्र्यदिनी जिल्हा रानभाजी महोत्सव

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

अकोला : कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेतर्फे (आत्मा) जिल्हा रानभाजी महोत्सव स्वातंत्र्यदिनी अर्थात शनिवार, दि. 15 ऑगस्ट रोजी सकाळी 10 ते दु. 3 या वेळेत येथील मूर्तिजापूर रस्त्यावरील 'आत्मा' कार्यालयाच्या परिसरात होणार आहे. आरोग्यासाठी पोषक असलेल्या अनेक रानभाज्या या माध्यमातून नागरिकांना उपलब्ध होणार आहेत. नागरिकांना रानभाज्यांची ओळख, आरोग्यविषयक महत्व व जनजागृतीसाठी रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात शेतकरी, तसेच शेतकरी गटांमार्फत रानभाज्या विक्री केली जाईल. जिल्ह्यातून अधिकाधिक नागरिकांनी महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन प्रकल्प संचालक डॉ. प्रेमसिंग मारग यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

### सुट्टीची सुचना

सर्व एजंट, प्रतिनिधी, वाचक, यांना कळविण्यात येते की, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त कार्यालयाला सुट्टी राहणार आहे. १५ ऑगस्ट रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

- वितरण व्यवस्थापक

CLASSIFIED

पाहिजेत

DHOLE HOSPITAL

- Doctor- MBBS/ BAMS/
- BHMS - २ पदे
- GNM/ ANM नर्स - ३ पदे
- कॉम्प्युटर ऑपरेटर- २ पदे
- OT असिस्टंट (Boy/Girls) - २ पदे
- साफ सफाई करिता मुलगा- १ पद

ठिकाण : रुख्मिणी नगर, अमरावती

- संपर्काची वेळ -
सकाळी ११.०० ते दुपारी २.००
- संपर्क क्रमांक -
9423126494















सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



## पावसाळ्यात बहरली वनराई

पावसाळा आला की सभोवतालची सृष्टी जणू काही नवा जन्म घेते. रखरखत्या उन्हाळ्यानंतर पडणाऱ्या पहिल्याच पावसाच्या सरींनी धरणी तृप्त होते आणि बघता बघता वनराई हिरव्यागार शालूमध्ये नटून उठते. **पावसाळ्यात वनराईच्या या देखण्या रूपाची काही खास वैशिष्ट्ये** : हिरवाईचा निसर्गरम्य देखावा: झाडे-वेलींवर नवी पालवी फुटते. डोंगर, दऱ्या आणि जंगले वेगवेगळ्या छटांच्या हिरव्या रंगाने न्हाऊन निघतात. **झरे आणि धबधबे:** तासनतास पडणाऱ्या पावसाने वनराईमध्ये छोटे-मोठे झरे आणि फेसाळणारे धबधबे जिवंत होतात. त्यांचा आवाज निसर्गाच्या या सौंदर्यात संगीताची जोड देतो.

# भारत स्वतंत्र पण शिक्षक पुन्हा पारतंत्र

आज भारत स्वतंत्र होऊन 80 वर्ष पूर्ण होत आहेत, भारतातील संपूर्ण नागरिक 80 वर्ष पूर्ण होत असल्याचा उत्सव साजरा करीत आहेत. 15 ऑगस्ट 1947 ला भारत देशातून इंग्रजी सत्ता निघून भारत देश स्वतंत्र झाला. तर 26 जानेवारी 1950 ला आपला देश प्रजासत्ताक म्हणून घोषित करण्यात आला, म्हणजेच भारतीय संविधान व राज्यघटने नुसार भारत देशातील लोकशाही कार्यप्रणालीला सुरुवात झाली. भारतीय राज्यघटनेने भारत देशातील प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र मिळवून दिले, देशातील प्रत्येक नागरिक आज स्वतंत्र आहे, प्रत्येक नागरिकाला भारत देशात कुठेही स्वतंत्र जीवन जगण्याचा, व्यवसाय करण्याचा, नोकरी करण्याचा व स्वाभिमान आणि अभिमानाने जगण्याचा अधिकार भारतीय संविधानाच्या कलमानुसार मिळाला आहे. भारत देश स्वतंत्र झाला आणि प्रत्येक भारतीय नागरिकाला मूलभूत अधिकार भारतीय राज्यघटनेनुसार प्राप्त झाले परंतु आज पुन्हा शिक्षक गुलामगिरीत जात असताना चित्र बघावयास मिळत आहे. भारत स्वतंत्र झाला शिक्षक मात्र गुलामीच्या जाळ्यात पुन्हा अडकला.

भारत देशातील शिक्षक अतिशय प्रामाणिक, मेहनती, बुद्धिमान, प्रेमळ, दयाळू स्वभावाचा असल्याची ओळख आहे. देश हिताचे कोणतेही काम प्रशासनामार्फत शिक्षकांवर दिले गेल्यास शिक्षक ते काम अतिशय प्रामाणिकपणे व जीवाचे रान करून पूर्ण करीत असतो. ज्यामध्ये भारतीय विद्यार्थ्यांना ज्ञानदानाच्या कामासोबतच शाळेतील इतर कामे, जसे शाळेची घंटा वाजवणे, खिचडी शिजवणे, पुस्तके वाटप करणे, शालेय कामकाज, लिखा - पडीची कामे तर शिक्षक करतोच परंतु यासोबतच शिक्षण व्यतीरिक्त जनगणना, एस. आय. आर. सर्वेक्षण, प्रशिक्षण, शालेय उपयोगी उपक्रम, ऑनलाइन ची कामे अनेक अशी कामे शिक्षक करीत आहेत. जास्तीत जास्त वेळेला अशी कामे फक्त शिक्षकांनाच दिल्या जात अहसल्याचे संपूर्ण जगाला माहित आहे. तरीसुद्धा शिक्षक कोणत्याही कामांमध्ये कामचुकारपणा, आळस, टाळाटाळ न करता प्रत्येक काम प्रामाणिकपणे व मेहनतीने पूर्ण करीत असतो. एवढेच नाही तर वर्गामध्ये किंवा वर्गाबाहेर एखाद्या विद्यार्थ्याला खेळताना लागली असल्यास त्याला वैद्यकीय उपचाराचा खर्च करून सुखसुख घरी पोहोचवून देतो, परीक्षेची फी परिस्थितीमुळे भरताना येणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा फी भरतो, आणि विद्यार्थ्यांचे हित जपतो. शिक्षक हा समाजशील प्राणी असून देश विकासाला हातभार लावणारा मुख्य घटक आहे. कारण त्याच्या हातून घडणारी पिढी ही भविष्यात देश चालविणारी असते. परंतु या शिक्षकांवर नेहमीच अन्याय होत असतानाचे चित्र भारत देशात बघावयास मिळत आहे.

गेल्या 80 वर्षापासून शिक्षकांवर कोणत्या ना कोणत्या कारणावरून चुकीचे ठरविल्या जाते आणि त्या कारणामुळे शिक्षकाची प्रतिमा मलीन झाली आहे. तसे पाहिले तर चुका मानवाकडून होत असतात, चुकातूनच माणूस शिकत असतो मग शिक्षक असल्यावर चूक होणार नाही का? कारण शिक्षक सुद्धा माणूसच आहे परंतु तरीसुद्धा दोषी शिक्षकांनाच ठरविण्यात येते. आज प्रत्येक क्षेत्रात आपले जबाबदारी कामे पूर्ण करीत असताना कोणत्या ना कोणत्या व्यक्तीकडून चुका किंवा गुन्हे घडत असतात यामध्ये वैद्यकीय क्षेत्र असेल, पोलीस शेत्र असेल किंवा इतर कर्मचारी असतील त्यांच्याकडूनही नेहमी चुका किंवा गुन्हा घडत असतो. इतर व्यक्तीकडून चुका घडल्यास काही काळ काही दिवस त्यावर चर्चा होते आणि नंतर सर्वजण विसरून जातात. परंतु शिक्षकांच्या हातून थोडी जरी चूक घडली किंवा गुन्हा घडला असेल तर त्याचा मोठा बाहु तयार करण्यात येतो. इतर क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कडे दुर्लक्ष केल्या जाते परंतु शिक्षकांनाच नेहमी धारेवर धरल्या जाते. तर एवढ्या मोठ्या कर्मचाऱ्यांमधून एखाद्या व्यक्तीकडून चुकीचे घडल्यावर संपूर्ण शिक्षकांनाच का वाईट म्हटले जाते. यामधे शिक्षकांवर नेहमीच बोट ठेवल्या जाते आणि अशा कारणामुळे शिक्षक मानसिक, शारीरिक व आर्थिक विवंचनेत येऊन पडतो. अशा अनेक कारणांमुळे शिक्षकांवर अन्याय अत्याचार होत असल्यामुळे शिक्षक आज पुन्हा गुलामीत असल्याचे चित्र दिसत आहे.

शिक्षणा व्यतिरिक्त कामामुळे शिक्षकाची दोन्ही बाजूने गळचेपी होतानाचे चित्र नुकत्याच एस. आय. आर. कार्यक्रमांतर्गत बघावयास मिळाले. यादरम्यान जनगणना होता बरोबर एस.आय.आर.चे काम शिक्षक कर्मचाऱ्यांना मिळाल्यानंतर अनेक शिक्षक मानसिक तान पडत आहे, तर काही आजारपणामुळे दगावल्याचे सुद्धा वाचण्यात आले आहे. म्हणजे शिक्षकांवर आलेली ही गुलामी इंग्रजांच्या गुलामी पेक्षा भयंकर दिसत आहे. एकीकडे प्रशासन व शासन कार्याचा तणाव तर दुसरीकडे शाळा व्यवस्थाकचा ताण, यामुळे शिक्षक ऐकणार तर कुणाचे? आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. आज शिक्षक सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत त्याला विविध कामे दिल्या गेली आहेत, त्यामुळे शिक्षकांवर मानसिक ताण निर्माण होत आहे. शिक्षकांचा सर्वात जास्त बुद्धीचा वापर होत असल्यामुळे त्याला शांत करण्याची गरज असते. पूर्वीच्या काळी शिक्षकांना शालेय कामकाज व्यतिरिक्त कामे कमी होती परंतु आता जास्त वाढविण्यात आली आहेत, तसेच विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पूर्वी शिक्षक कर्मचारी पुरेसे उपलब्ध होते परंतु आज हजारो जागा रिक्त आहेत, हजारो शाळा बंद पडल्यामुळे कर्मचारी घरी परतले आहेत. विनाअनुदानित, स्वयं अर्थसहाय्य शाळा निर्माण करून शिक्षण क्षेत्राचा बाजार निर्माण केला आहे. म्हणजेच एकूण पाहिले तर शिक्षकाची परिस्थिती घर का ना घाट का, अशी निर्माण झाली आहे. भारतीय संविधानाला दिलेले मूलभूत हक्कच शिक्षकांन जवळून हिरावून घेतल्या चालल्या जात आहेत. यामध्ये शासनाकडून नुकतेच एक परिपत्रक काढण्यात आले आहे त्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचा, बंड करण्याचा किंवा लेखणीतून विचार व्यक्त करण्याचा अधिकार सुद्धा हिरावून घेतल्याचे वाचण्यास मिळाले आहे. म्हणजेच शिक्षकांच्या मूलभूत हक्कांचा गळा आवळण्याचे काम सुरू आहे ,अशी परिस्थिती देशात राहिल्यास देशाचा विकास करणारे, विद्यार्थ्यांच्या माध्यमातून देशाची नवी पिढी घडवणारे शिक्षकच गुलामगिरीत राहतील तर देश पुन्हा गुलामगिरीत जाण्यास काहीच वेळ लागणार नाही. शिक्षकाला मूलभूत हक्क पुन्हा मिळवण्यासाठी पुन्हा स्वतंत्र लढा उभारावा लागेल ज्या पद्धतीने आज युवा पिढी आपल्या शिक्षणासाठी, शिक्षणाच्या मूलभूत हक्कासाठी दिल्ली जंतर मंतर येथे आंदोलने करून आपले अधिकार हक्क मिळवू शकते. त्याच पद्धतीने शिक्षकांना सुद्धा आपले मूलभूत हक्क मिळवण्यासाठी आंदोलन करण्याची वेळ आली आहे, तरच भारतीय देश पुन्हा गुलामगिरीत जाण्यापासून वाचेल.

**- प्रा. प्रज्ञानंद थोरात**
अकोला मो. 9822674487

# विलासराव देशमुख सरपंच ते मुख्यमंत्री असा प्रवास करणारे चाणाक्ष राजकारणी

विलासराव दगडोजीराव देशमुख हे मराठी, भारतीय राजकारणी होते. इ.स. १९७४ साली बाभळगाव ग्रामपंचायतच्या सरपंच पदापासून आपली राजकीय कारकीर्द सुरू करणारे विलासराव १८ ऑक्टोबर १९९९ ते १६ जानेवारी २००३ व १ नोव्हेंबर २००४ ते ४ डिसेंबर २००८ या कालखंडांदरम्यान ते दोन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. ते मनमोहनसिंग मंत्रिमंडळात अवजड उद्योग व सार्वजनिक उपक्रम खात्याचे केंद्रीय मंत्री होते. ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य होते.

विलासराव देशमुखांनी पुणे विद्यापीठातून बीएससी आणि नंतर कायद्याची पदवी घेतली. वयाच्या २९ व्या वर्षी म्हणजे १९७४ मध्ये ते बाभळगावचे सरपंच झाले. तुळजापूरच्या तुळजाभवानी देवी वर त्यांची खूप श्रद्धा होती आणि तुळजापूरचे तत्कालीन आमदार कै.साहेबराव हंगरगेकर यांच्याशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. युवक काँग्रेसचे नेते, तेव्हाच्या एकत्रित उस्मानाबाद बँकेचे संचालक, पंचायत समितीचा उपसभापती, जिल्हा परिषद सदस्य असे करीत करीत ते १९८० मध्ये पहिल्यांदा विधानसभेवर निवडून गेले. १९८२ मध्ये बाबासाहेब भोसले यांनी त्यांना पहिल्यांदा राज्यमंत्रिपद दिले. आमदारकीच्या पहिल्याच टर्ममध्ये अवघ्या दोन वर्षात मंत्रिपद मिळालेल्या विलासरावांनी नंतर मागे वळून पाहिले नाही. पुढे १९९५ पर्यंत काँग्रेसचे अनेक मुख्यमंत्री झाले. पण विलासराव सदैव मंत्रिमंडळात राहिले. शिक्षण, कृषि, उद्योग, सांस्कृतिक, महसूल अशा अनेक महत्त्वाच्या खात्यांचा कारभार त्यांनी कार्यक्षमपणे केला.

१३ ऑक्टोबर १९९९ ला विलासराव पहिल्यांदा आणि २००४ च्या निवडणुकीनंतर दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. पण २००८ साली मुंबई वर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने त्यांना आपले मुख्यमंत्री पद गमवावे लागले.

विलासराव देशमुख यांचा जन्म २६ मे १९४५ रोजी लातूर जिल्ह्यातील बाभळगाव येथे झाले. त्यांचे शिक्षण बीएससी, बीए, एलएलबीपर्यंत झाले आहे. १९७४ बाभळगावचे सरपंच, इ.स. १९७४ ते ७९ सदस्य, उस्मानाबाद



**आज स्मृतिदिन**

जिल्हा परिषद तसेच उपाध्यक्ष, लातूर तालुका पंचायत समिती. १९८०पासून इ.स. १९९५पर्यंत आमदार, १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत पराभव. पुन्हा १९९९ ते २००९पर्यंत आमदार. १९८२ ते १९८५ दरम्यान राज्यमंत्री, ग्रामविकास, गृह, सामान्य प्रशासन, कृषी, परिवहन, शिक्षण, तंत्रशिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, माहिती व जनसंपर्क ही खात्यांचे मंत्रिपद. १९८६ ते १९९५ या कालखंडात कॅबिनेट मंत्री. ग्रामविकास, कृषी, सहकार, दुग्धविकास व पशुसंवर्धन, सार्वजनिक बांधकाम, उद्योग, शिक्षण आणि तंत्रशिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, परिवहन, संसदीय कार्य खात्यांचा कार्यभार. १८ ऑक्टोबर १९९९ ते जानेवारी, इ.स. २००३ मुख्यमंत्रीपदाची पहिली टर्म. ११ नोव्हेंबर २००४ ते ७ डिसेंबर २००८ मुख्यमंत्रीपदाची दुसरी टर्म. ऑगस्ट २००९ मध्ये राज्यसभेवर निवड. २००९ ते २०११ दरम्यान केंद्रीय अवजड उद्योग खात्याचे मंत्री. जानेवारी २०११ ते १२ जुलै २०११ ग्रामविकासमंत्री आणि पंचायत खात्याचा अतिरिक्त कार्यभार. १२ जुलै २०११पासून विज्ञान व तंत्रज्ञानमंत्री असा विलासरावांचा राजकीय प्रवास आहे.

### आरोप आणि ताशेरे

- मुंबई दहशतवादी हल्ल्याबाबत गंभीर नसल्याचा झालेला आरोप.
- दिलीप सानंदा प्रकरणी उच्च न्यायालयाने ठोठावलेला दंड.
- आदर्श प्रकरणी निर्माण झालेला संशय
- सुभाष घई यांना जमीन देण्यावरून न्यायालयाने ओढलेले कडक ताशेरे

इ.स. १९९५ साली शिवाजीराव कव्हेकर यांनी विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव केला. हा त्यांच्या कारकिर्दीतला सर्वात मोठा हादरा होता. त्यानंतर काँग्रेसच्या बाहेर जाऊन शिवसेनेच्या मदतीने विधानपरिषदेवर येण्याचा त्यांचा प्रयत्नही फसला होता. पण पुढे दोनच वर्षात ९५ हजार मतांच्या फरकाने निवडून येऊन ते मुख्यमंत्री झाले.

१४ ऑगस्ट २०१२ रोजी भाप्रवेनुसार दुपारी १:३० मिनिटांनी त्यांचा यकृताच्या आजाराने चेन्नईतील ग्लोबल हॉस्पिटल येथे निधन झाले. त्यांची दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाली होती आणि यकृताचा कर्करोग (हेप्टोसेल्युलर कार्सिनोमा) झाल्याने यकृताला सूज आली होती. विलासराव देशमुख यांच्यावर लातूर जिल्ह्यातील बाभळगाव ह्या त्यांच्या मूळगावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. बंदुकीच्या १७ फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. विलासराव देशमुखांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त पुण्यात शरद पवार यांच्या हस्ते 'आठवणीतील विलासराव' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

# भीमनगरच्या झोपडपट्टी पासून ऑक्सफर्डपर्यंत : असंग वानखेडेचा प्रवास



संशोधनाच्या क्षेत्रात क्वचितच असे प्रसंग येतात जिथे एखाद्या व्यक्तीचा शैक्षणिक प्रवास सामाजिक संरचनांचे सखोल विश्लेषण करण्यासाठी एक माध्यम बनते. भीमनगरच्या असंग वानखेडे याने ऑक्सफर्ड विद्यापीठाची कायद्यातील DPhil पूर्ण केली. नुकताच त्यांच्या पदवीदानाचा समारंभ पार पडला.हा बहुमान प्राप्त करण्याचा हा प्रवास केवळ त्याच्या वैयक्तिक यशाची कहाणी नाही तर भारतीय जातिव्यवस्थेच्या कठोर वास्तवाचे आणि शैक्षणिक संस्थांमधील संरचनात्मक भेदभावाचे उदाहरण आहे. हे यश संपूर्ण समाजासाठी एक मैलाचा दगड ठरेल यात शंका नाही.

भारतात जातीय भेदभाव हा केवळ सामाजिक रूढी नसून तो आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातही खोलवर रुजलेला आहे. आणी विशेषतः २०१४ नंतर त्यात आणखी भर पडली आहे. याचा अर्थ आधी नव्हता असं नाही जातीवाद हा जणू शापचं दलितांसाठी आहे अशी परिस्थिती असतांनाही असंग वानखेडे यांचे यश हे प्रेरणादायी ठरते. आंबेडकरी चळवळीच्या इतिहासात शिक्षण हे सामाजिक मुक्तीचे प्रमुख साधन मानले गेले आहे. परंतु दलित समाजासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रवेश अजूनही दुर्गम आहे. त्यातून मार्ग काढत चं असंग सारखे विद्यार्थी पुढे जात आहेत ही बाब अभिमानास्पद आहे. सुरज येंगडे यांच्या संशोधनानुसार, "भारतात जन्मतःच जातीय वर्गीकरण ठरते आणि बाजार अर्थव्यवस्थेवर आधारित समाजांमध्ये वर्ग बदलण्याची शक्यता असते. परंतु भारतात जातीय जीवनशैली संपूर्ण आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनावर पसरलेली आहे". याचाच अर्थ असा की, दलित समाजातील प्रतिभावान विद्यार्थ्यांना अनेकदा नवनवीन अडथळ्यांचा सामना करावा लागतो.असंग वानखेडे जे स्वतः नागपूरमधील भीमनगर येथे वाढले आणि आता ऑक्सफर्ड विद्यापीठात कायद्याचे संशोधक आहेत. त्यांचा अनुभव या वास्तवाचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. दिल्ली येथील वसतिगृहात देखील त्यांना जातीवादाचा सामना करावा लागला. हा अनुभव अनेक शैक्षणिक संस्थांमधील जातीय विभाजनाचे द्योतक आहे. दलित विद्यार्थ्यांना तीन स्तरांवर भेदभाव सहन करावा लागतो एक म्हणजे सोबत च्या विद्यार्थ्यांचा, प्राध्यापक वर्गाचा, आणि संस्थात्मक धोरणांचा."एका प्राध्यापकाने विद्यार्थ्यांसमोर आरक्षण धोरणावर आक्षेप घेतला आणि दलित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले" ह्या आणि अशा अनेक घटना ह्या केवळ वैयक्तिक पूर्वग्रह नसून शैक्षणिक व्यवस्थेतील जातीय व्यवस्थेचे प्रतिबिंब आहे.या भेदभावाचा दलित विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. "एकट्याने जातीय संस्थेशी झुंज देणे म्हणजे मोठी किंमत चुकवणे होय. मग ती किंमत त्यांच्या जीवावर देखील येऊ शकते. रोहीत वेमुला, पायल तडवी आणि दर्शन सोलंकी यांसारख्या विद्यार्थ्यांचे आत्महत्या प्रकरण ताजेचं आहे. जे शैक्षणिक संस्थांमधील जातीय तणावाची दुखद उदाहरणे आहेत. आर्थिक दारिद्र्य हा जातीय भेदभावाचा अपरिहार्य भाग आहे.

**प्रा. राहुल गोवर्धन माहुरे**
शांतीनगर, जुनेशहर, अकोला
मो. 9822278925

# 60, 70, 80, 90 आणि 100 ही वये का साजरी केली जातात?

भारताच्या दक्षिण भागात, ६०, ७०, ८०, ९० आणि १०० ही वये मोठ्या थाटामाटात साजरी करण्याची परंपरा आहे. एकदा कोणीतरी मला यामागचे कारण विचारले: "आपण ६०, ७०, ८०, ९० आणि १०० सारखी वये इतक्या भव्यतेने का साजरी करतो? हे आकडे आध्यात्मिक आहेत की केवळ सांस्कृतिक परंपरा?" याचे उत्तर महाभारतातील एका प्रभावी कथेत दडलेले आहे—राजा ययातीची कथा. राजा ययातीने आयुष्य पुरेपूर जगले—सत्ता, सुख, यश, सर्वकाही. पण जेव्हा अचानक म्हातारपण आले, तेव्हा त्याला मोठा धक्का बसला. गहन चिंतनानंतर त्याला एक गहन सत्य उमगले. "सुखाला मर्यादा असतात, पण इच्छांना नसतात." या जाणिवेने त्याचे आयुष्य बदलून टाकले. त्यांनी वृद्धावस्था स्वीकारली आणि स्पष्ट केले की जीवनात पाच आंतरिक टप्पे येतात—जे वयावर नव्हे, तर समजुतीवर आधारित असतात. विशेष म्हणजे, हे पाच टप्पे भारतीय संस्कृतीतील ६०, ७०, ८०, ९० आणि १०० वर्षांच्या पारंपरिक टप्प्यांशी जुळतात. चला, आपण ते सोप्या भाषेत समजून घेऊया:

**६० – षष्ठी षष्ठीपूर्ती :** मन संचयाकडून समजुतीकडे वळते. सुमारे ६० व्या वर्षी, काहीतरी बदलते—शरीरात नव्हे, तर प्राधान्यक्रमात. "मी अजून किती मिळवू शकेन?" हा प्रश्न हळूहळू नाहीसा होतो आणि त्याची जागा "आता खरोखर महत्त्वाचे काय आहे?" हा प्रश्न घेतो. आत्मपरीक्षण सुरू होते. गोंधळ, प्रशंसा आणि बाह्य मान्यतेची गरज कमी होते. स्पष्टता केंद्रस्थानी येते. हा ऱ्हास नाही—ही महत्त्वाकांक्षेच्या पलीकडची परिपक्वता आहे.

**७० – भीमरथ शांती**

स्वतःला सिद्ध करण्यापेक्षा शांती अधिक शक्तिशाली वाटते. आपल्या चाळीशी आणि पन्नाशीत, आपण जगाला स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. वयाच्या सत्तरीत, एक शांत बदल घडतो. तुम्ही आता तात्काळ प्रतिक्रिया देत नाही. वादविवादाचे आकर्षण कमी होते. वाद जिंकण्यापेक्षा नातेसंबंध टिकवणे अधिक महत्त्वाचे वाटू लागते. तुम्हाला जाणीव होते. बरोबर असण्यापेक्षा शांत राहणे अधिक मौल्यवान आहे. म्हणूनच सत्तरी साजरी केली जाते.

**८० – शतभिषेकम**

तुमचे अस्तित्वच एक उपचार ठरते. वयाच्या ऐंशीव्या वर्षी, लोक केवळ सल्ल्यासाठी तुमच्याकडे येत नाहीत. ते काहीतरी अधिक खोलवरच्या गोष्टीच्या शोधात येतात—जीवन जगता येते, समजून घेता येते आणि परिपूर्ण करता येते, या आश्वासनासाठी. तुमचे अस्तित्वच एक आशीर्वाद ठरते. शब्दांची आता गरज उरत नाही. तुमचे अस्तित्वच हा संदेश देते. "सगळं काही ठीक होतं. जीवन आपला मार्ग शोधतं." म्हणूनच ८० हे वय पवित्र मानले जाते.

**९० – नवती :** अहंकार शांतपणे निवृत्त होतो. वयाच्या ९० व्या वर्षी एक दुर्मिळ गोष्ट घडते. तुम्हाला इतरांना सुधारण्याची गरज वाटत नाही. तुम्ही तुमच्या मतांना चिकटून राहत नाही. तुम्ही गोष्टी वैयक्तिकरित्या घेत नाही. तुम्हाला सहजासहजी दुखावले जात नाही. हे दुर्बलतेमुळे नाही—तर आयुष्याने तुम्हाला आधीच खूप काही दाखवून दिल्यामुळे होते. क्षुल्लक गोष्टींसाठी आता तुमची ऊर्जा खर्च करण्याची गरज नसते. अंतर्मनात एक शांतता स्थिरावते. हीच नम्रता खरी आध्यात्मिकता आहे.

**१०० – शतमानम् :** आयुष्य वैयक्तिक कथांच्या पलीकडे जाते. शंभर वर्षे पूर्ण करणे म्हणजे केवळ वर्षे मोजणे नव्हे. ही एक अशी अवस्था आहे जिथे व्यापक चित्र स्पष्ट होते. तुमच्या अनेक चिंता अनावश्यक होत्या हे तुमच्या लक्षात येते. तुम्ही दिलेले प्रेमच खऱ्या अर्थाने महत्त्वाचे होते. आणि आयुष्याला नेहमीच एका रहस्यमय, करुणामय शक्तीने मार्गदर्शन केले होते. शंभर वर्षांच्या वयात, व्यक्ती ही केवळ एक "व्यक्ती" न राहता, एक "अस्तित्व" अधिक बनते. सारांश, आपल्या ऋषीमुनींनी वयाचा उत्सव साजरा केला नाही—तर त्यासोबत येणाऱ्या आंतरिक परिवर्तनाचा उत्सव साजरा केला. ६० – प्राधान्यक्रम बदलतात, ७० – शांती ही शक्ती बनते, ८० – उपस्थितीच उपचार ठरते, ९० – अहंकार शांतपणे विरघळतो, १०० – जीवन परिपूर्ण होते. वय म्हणजे अशक्तपणा नव्हे. वय ही एक शुद्धीकरणाची प्रक्रिया आहे. ज्याद्वारे शहाणपण, सौम्यता आणि कृपा टिकून राहते. वृद्ध होणे म्हणजे जीवनात अधिक शुद्ध, अधिक शहाणे आणि अधिक सौम्य होणे.

# निष्क्रीय-उदासीन जनता व बेजबाबदार राज्यकर्ते

आपल्या देशातील सामान्य नागरिकांना अनंत काळापासून दैनंदिन जीवन जगत असताना भेडसावणाऱ्या ज्या ज्वलंत नमस्या आहेत त्यामध्ये सध्या सुरू असलेल्या पावसाळयात खड्डे, उन्हाळयात भिषण पाणी टंचाई व गल्लीबोळापासून तर देशभर भटक्या बेवारस कुत्र्यांची, मोकाट जनावरांची समस्या. प्रामाणिकपणे विचार केल्यास वरील सर्व समस्या मानव निर्मित आहेत. यामध्ये निसर्गाचा किंवा अन्य गोष्टींचा काहीच संबंध नाही. याला पूर्णतः उदासीन-निष्क्रीय जनता व बेजबाबदार राज्यकर्ते जबाबदार आहेत. प्रशासनातर्फे नुसता टाईमपास सुरू आहे. सामान्य जनता दररोज मरण यातना सहन करीत आहे. वरील समस्यांपैकी सर्व प्रथम खड्डे समस्येवर प्रकाश टाकुया. पावसाळा फक्त चार महिन्याचा असतो. त्यातही तो बरेच दिवस विश्रांतीवर असतो. फक्त पावसाळयातच खड्डे पडतात आणि बाकी दिवसात रस्ते गुळगुळीत असतात असे अजिबात नाही. एकंदरीत अनादिकाळापासून उद्भवणाऱ्या या खड्डे समस्येवर पावसाळयातच आराडाओरडा करण्यापेक्षा संबंधीतांना भेटून या समस्येवर लोकशाही मार्गाने कायमस्वरूपी तोडगा काढणे गरजेचे आहे.

यानंतरची दुसरी समस्या उन्हाळयातील भीषण पाणी टंचाईची ही समस्या देखील मानव निर्मित नाही. सालाबादा प्रमाणे दरवर्षी महाराष्ट्रातील जनता प्रामुख्याने उन्हाळ्यात पाणी टंचाईने होरपळत राहते. महिला जीव मुठीत धरून विहीरीत उतरतात. शेतकरी करपलेल्या पिकाकडे पाहत राहातात. पाऊस पडला तर जुन्या यातना विसरायच्या व दुष्काळ पडला तर तडफडत राहायचे. या दृष्टचक्रात किती दिवस अडकून पडायचे !

यानंतर लहान मुलांपासून तर वयस्क व्यक्तींपर्यंत सर्वांनाच भेडसावणारी गंभीर समस्या म्हणजे मोकाट बेवारस कुत्रे. चावल्यामुळे रेबीज सारखा घातक रोगाची लागण होण्याची, अपघातग्रस्त होवून कायम जायबंदी होण्याची व नागरिक दगावल्याच्याही घटना पूर्ण देशभर घडत आहेत. बेवारस कुत्र्यांच्या दहशतीमुळे अनेक नागरिकांनी सकाळी फिरणे तसेच आरोग्याकरीता सायकलींग करणे बंद केले आहे. हे कुठल्या एका शहराचे, राज्याचे चित्र नसून पुर्ण देशाचीच समस्या आहे. मोकाट बेवारस जनावरे भर रस्त्यात तासनतास ठाण मांडून रस्ता अडवून बसतात. उदंड झाली जनावरे असा हा प्रकार आहे. प्रशासनाला किंवा राज्यकर्त्यांना हे दिसत नाही असे नाही. प्रशासन हे आंधळे बहीरे मुके असते असे म्हणतात. पाण्यात बसलेल्या म्हशीसारखी प्रशासनाची अवस्था आहे. एकदाची म्हैस हालेल पण प्रशासन हलणार नाही.

वर उल्लेखीत समस्यापैकी प्रामुख्याने मोकाट बेवारस कुत्र्यांच्या समस्येवर सर्वोच्च न्यायालयाने पिसाळलेल्या बेवारस कुत्र्यांना मारून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. मध्यंतरी पाकिस्तान सरकारने १० हजार कुत्रे मारून टाकले होते. असा मर्दपणा भारत सरकार दाखवणार आहे काय? कुत्रे चावल्यामुळे तसेच रस्त्यावरील खड्डयामुळे जायबंदी झालेल्या किंवा मृत्यू पावलेल्या व्यक्तीला संबंधीतावर गुन्हा दाखल करून नुकसान भरपाई देण्याचे आदेश ही न्यायालयाने दिले आहेत.

पाणी टंचाई तथा वर उल्लेखीत इतर समस्यांच्या संदर्भात जागृत नागरीकांनी आपल्या विभागातील संबंधीत नगरसेवक, महानगर पालिका पदाधिकारी, आमदार, खासदार यांना लोकशाही पद्धतीने आपल्या समस्या सांगाव्यात. समस्यांचे निराकरण न झाल्यास संबंधीतांना गावबंदी करून एकही दिवस गावात पाय न ठेवण्याची सक्ती करावी. हा गावकऱ्यांचा अधिकार आहे. आपण लोकशाही मार्गाने दिलेल्या आपल्या अधिकाराचा वापर न केल्यामुळे आपण आयुष्यभर मरण यातना भोगतो आहे व राज्यकर्ते गलेलठ्ठ होत आहेत. जाऊ तेथे खावू हा यांचा एक कलमी कार्यक्रम आहे. पदाधिकाऱ्यांना नवीन नवीन गाड्या पाहीजेत. जुन्या गाड्यांमध्ये त्यांचे कंबरडे मोडते. जनतेच्या कंबरडयांची त्यांना पर्वा नाही. हे चित्र बदलणे आवष्यक आहे. नामान्य जनता खरी मालक आहे राजा आहे सेवकच राजा होवून मलई खात आहे. आता तरी उठा आणि जागे व्हा.

एकंदरीत शासनाच्या भरवशावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहिल्याने परिस्थितीशी सामाना करण्याची जिद्दच सामान्य माणूस हरवून बसतो. इतर कुणाच्याही मदतीवर विसंबून न राहता तुच तुझ्या भविष्याचा शिल्पकार हो. ही भावना सकारात्मक अर्थाने घेतल्यास यातूनच संघर्ष करण्याची जिद्द निर्माण होते. सर्वसामान्य नागरिकांमध्ये ही जिद्द निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

वरील सर्व गंभीर समस्यांकडे समाज सेवी संघटना तसेच प्रसारमाध्यमे यांचे लक्ष वेधावे म्हणून लेखाचे प्रयोजन आहे. जनतेनेही निद्रीस्त अथवा बघ्याच्या भुमीकेतून बाहेर पडल्यास जटील व दिवसेंदिवस गंभीर समस्येवर कायम स्वरूपी तोडगा निघू शकेल.

"आता उठवू सारे रान- आता पेटवू सारे रान
सर्वसामान्य नागरिकांच्या समृद्धीसाठी
सुजलाम सुफलाम राज्यासाठी लावू पणाला प्राण"

**डॉ. प्रकाश घवघवे**
रामनगर, नागपूर
मो. 9881723363

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# महापालिकेच्या महासभेचे लाईव्ह प्रसारण बंद

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अकोला :** अकोला महानगरपालिकेत सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचा मनमानी अन् हुकूमशाही कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. थेट मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदन ठरावाच्या दिवशीच महापालिकेचे थेट प्रक्षेपण तडकाफडकी बंद करण्यात आले. या पुर्वीच लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांना सभागृहात प्रवेश नाकारत त्यांना थेट टीव्हीवर महासभा पाहण्याचा सल्ला देण्यात आला. भाजप सरकारच्या या 'दडपशाही' निर्णय कोणी घेतला आणि सत्ताधाऱ्यांना पत्रकारांची एवढी भीती का वाटते ? असा जळजळीत प्रश्न आता अकोलेकर विचारत आहेत.

**मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदन ठरावाच्या दिवशीच अप्रिय निर्णय !**

शेतकरी कर्जमाफी संदर्भात महासभेत मुख्यमंत्र्यांचा अभिनंदनाचा ठराव मांडला जाणार होता. वास्तविक पाहता या ठरावाचा व्यापक प्रसार होणे अपेक्षित होते. मात्र, याच दिवशी अचानक लाईव्ह प्रसारण बंद करण्याचे आदेश देण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदन ठरावाचे थेट प्रक्षेपण रोखणारे कोण ? असा सवाल उपस्थित होत आहे. लाईव्ह बंद करून बंद दाराआड असे कोणते ठराव लोकांपासून लपवून मंजूर केले जात आहेत, याबद्दल संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. विरोधक फुटेज खातात म्हणून की सत्ताधाऱ्यांचे वकृत्व कमी ? अकोला महापालिकेत यापूर्वीच्या सर्व महासभांचे लाईव्ह प्रसारण सुरळीत सुरू होते. मग आजच हे अचानक का बंद करण्यात आले ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**आयुक्तांनी संरक्षण द्यावे, पालकमंत्र्यांनी हस्तक्षेप करावा !**

महापालिकेत सुरू असलेल्या या हुकूमशाहीविरोधात सर्व स्तरांतून संतापाचा उद्रेक होत आहे. महापालिका आयुक्तांनी लोकशाहीच्या चौथ्या स्तभाला संरक्षण देत पत्रकारांवरील बंदी उठवावी, तसेच अकोल्याचे पालकमंत्री यांनी या मनमानी कारभारात तत्काळ हस्तक्षेप करून थेट प्रसारण पूर्ववत सुरू करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी जोर धरत आहे.अकोला महापालिकेत भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत वादहा व्हिडिओ अकोला महापालिकेतील राजकीय तणाव आणि सत्ताधारी पक्षांमधील अंतर्गत वादाची परिस्थिती दाखवतो.

**मुख्यमंत्र्यांचे कौतुक अकोलेकरांना दिसू नये - नीलेश देव**

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचं कौतुक अकोलेकरांना दिसू नये, ही भाजपची भूमिका असावी. माननीय मुख्यमंत्र्यांनी जी खरोखर शेतकरी कर्जमाफी केली आहे, तिचे अकोलेकरांनी कौतुक पाहावे; पण हे कौतुक दाखवायला जर भाजप तयार नसेल, तर अकोलेकरांना मुख्यमंत्र्यांचं कौतुकही पाहू द्यायचं नाही, ही अत्यंत निषेधार्ह गोष्ट आहे. किमान मुख्यमंत्र्यांचं कौतुक तरी अकोलेकरांना दिसावं, हीच आमची मागणी आहे. लाईव्ह प्रक्षेपण असायलाच हवं. कारण आज सर्वसामान्य जनतेला समजतंय की सभागृहात प्रत्येक क्षणी काय घडतंय. छोटे-मोठे विषय होत असतात, पण लहान-सहान विषयांवरून काही सभा थांबत नाही. पण सर्वसामान्य जनतेला लाईव्हच्या माध्यमातून सर्व दिसायला हवे.

## आधी पत्रकारांना प्रवेश बंदी आता नवा निर्णय



### मनपात दरोडेखोरी लपविण्याचा प्रयत्न - डॉ.जिशान हुसेन

जेव्हा एखादी गोष्ट लपवली जाते, तेव्हा ती यासाठी लपवली जाते कारण कुठे ना कुठे चोरी होत असते. यांची चोरी आणि दरोडेखोरी इतकी वाढली आहे की, आधी त्यांनी काहीतरी बहाणा करून पत्रकारांना आत येऊ दिले नाही. तेव्हा असं सांगण्यात आलं होतं की, पत्रकारांना आत येऊ दिलं नाही तरी आम्ही सर्व लाईव्ह स्ट्रीमिंग (थेट प्रक्षेपण) करू. या देशाच्या संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा बोलतात, तेव्हा लाईव्ह बोलतात. विधानसभेत जेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलतात, तेव्हा ते लाईव्ह बोलतात. मग आमचा भारतीय जनता पक्षाला हा प्रश्न आहे—तुम्ही अशी कोणती चोरी किंवा दरोडा टाकत आहात की, जे तुमच्या पक्षाचे पंतप्रधान आणि मुख्यमंत्री लाईव्ह बोलण्यासाठी तयार आहेत, जिथे सर्व लाईव्ह कामकाज होतं, पण अकोला महानगरपालिकेत तुम्ही असा कोणता दरोडा टाकत आहात जो तुम्हाला लपवावा लागतोय ?

### पत्रकारांनी टि.व्ही.वर पहावे - सभापती विजय अग्रवाल

पत्रकारांना एंट्री आहे. खाली त्यांची बसण्याची व्यवस्था केलेली आहे. तिथे टीव्ही लावलेला आहे. वरती सभागृहामध्ये न बसण्याचं काही कारण नाही, सभागृहामध्ये जागाच नाही आहे. आपण येऊन स्वतः पाहून घ्या, जागा आहे का ? जागा असती तर आम्हाला काही अडचण नाही आहे. जागा नसल्यामुळे खाली त्यांची बसण्याची व्यवस्था केली, तिथे टीव्हीची व्यवस्था झालेली आहे. आणि जिथे जे सभागृहात होईल, ते खाली दिसणार आहे. लाईव्ह याच्यासाठी बंद केलं की त्याच्यामुळे अनेक भानगडी होतात. लोकं त्याच्यामुळे उत्तेजित बोलतात, ते बाहेर जाते ते योग्य जात नाही म्हणून लाईव्ह बंद केलं.

### महासभेत विरोधक भारी पडतात का

महासभेत विरोधी पक्षांचे नगरसेवक सत्ताधाऱ्यांना उघडे पाडतात आणि अधिक 'फुटेज' मिळवतात. दुसरीकडे सत्ताधारी भाजपच्या नेत्यांचे वकृत्व कमी पडत असल्यानेच हा 'ब्लॅकआऊट'चा मार्ग निवडल्याची जोरदार चर्चा महापालिका वर्तुळात रंगली आहे. या संपूर्ण प्रकरणावर विचारणा केली असता महापौर शारदा खेडकर आणि स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी मौन बाळगणे पसंत केले आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील थकीत देयकांचा घोटाळा ?

## डॉ. काळे समितीचा अहवाल सिटी न्यूज सुपरफास्ट जवळ

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील कंत्राटदार संतोष एम. म्हातारमारे यांच्या थकीत देयकांच्या तक्रारीची सखोल चौकशी करणाऱ्या अंतर्गत समितीच्या अहवालातून अनेक प्रशासकीय व तांत्रिक त्रुटी समोर आल्या आहेत. नस्त्या अपूर्ण असणे, योग्य मंजुरी नसणे आणि संशयास्पद कारभाराच्या कारणांमुळे ही चौकशी समिती अंतिम निष्कर्षापर्यंत पोहोचू शकलेली नाही. त्यामुळे हे संपूर्ण प्रकरण वित्तीय आणि आर्थिक अनियमिततेशी निगडित असल्याने यावर तज्ज्ञांमार्फत अधिक सखोल चौकशी करण्याची शिफारस समितीचे अध्यक्ष डॉ. एन. एस. काळे यांनी केली आहे.कामाच्या काळातील तात्कालीन भंडारपाल पी. एस. पाल व एम. आर. लांजेवार यांचे निधन झाल्यामुळे समितीला त्यांची चौकशी करता आली नाही. तर तत्कालीन सहाय्यक कुलसचिव श्री. एच. एफ. राठोड यांच्याकडूनही या संदर्भात समाधानकारक उत्तरे किंवा पत्रव्यवहार प्राप्त झालेला नाही. नस्ती क्र. १७ सोडल्यास इतर सर्व नस्त्यांमध्ये प्रक्रिया अपूर्ण राहिलेली आहे. स्थानिक समितीच्या वरिष्ठ पातळीवर मर्यादा असल्याने व वित्तीय बाबींचे गांभीर्य लक्षात घेता, या प्रकरणाची आर्थिक व कायदेशीर तज्ज्ञांमार्फत उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी शिफारस समितीने आपल्या अहवालात केली आहे.

**अहवालातील मुख्य प्रशासकीय त्रुटी आणि आक्षेप**



श्री संतोष म्हातारमाळे कॉन्ट्रॅक्टर यांचा थकीत देयकाच्या तक्रारीची सखोल चौकशी केली असता तत्कालीन व विद्यमान भंडारपाल यांनी सादर केलेले दस्तावेज तपासले असता सदर देयकांबाबतच्या नस्त्या अपूर्ण असून त्यावर तत्कालीन भंडारपाल यांची स्वाक्षरी नसून स्व. श्री पी. एस. पाल, शाखाधिकारी यांची व तत्कालीन सहायक कुलसचिव श्री एच. एफ. राठोड यांच्या स्वाक्षऱ्या नस्तीवर झालेल्या आहेत. परंतु तत्कालीन सहयोगी अधिष्ठाता यांच्या सादर नस्तीवर स्वाक्षऱ्या झालेल्या नसून केवळ काही नास्तीमधील वर्क ऑर्डरवर स्वाक्षरी झालेली आहे.

उपरोक्त नमूद बाबीमुळे श्री म्हातारमाळे यांच्या तक्रारीमधील नमूद थकीत देयकासंबंधी सादर चौकशी समितीला कुठलाही निष्कर्षापर्यंत पोहोचता आले नाही. करीत सादर प्रकरण हे आर्थिक बाबीशी निगडित असल्यामुळे याबाबत तज्ञांकडून अजून सखोल चौकशी करणे उचित राहील असे समितीचे मत आहे.

(डॉ.एन.एस. काळे)
सहयोगी प्राध्यापक तथा अध्यक्ष

**१) अपूर्ण नस्त्या व स्वाक्षऱ्यांचा अभाव :** तपासणीदरम्यान बहुतांश नस्त्या अपूर्ण आढळून आल्या आहेत. तत्कालीन व विद्यमान भंडारपाल यांनी सादर केलेल्या दस्तऐवजांवर तात्कालीन भंडारपाल यांची स्वाक्षरीच आढळलेली नाही. केवळ स्व. श्री. पी. एस. पाल (शाखाधिकारी) व तत्कालीन सहाय्यक कुलसचिव श्री. एच. एफ. राठोड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तसेच तत्कालीन सहयोगी अधिष्ठाता यांच्या स्वाक्षऱ्या मुख्य नस्तीवर नसून केवळ काही मोजक्या वर्क ऑर्डरवरच आढळल्या आहेत.

**२) नियमबाह्य कामकाज पद्धत :** नियमानुसार प्रथम टिप्पणी , दरपत्रक/निविदा प्रक्रिया, सहयोगी अधिष्ठाता यांची मंजुरी, त्यानंतर वर्क ऑर्डर आणि काम पूर्ण झाल्यावर साठा पुस्तकात नोंद घेऊन देयके सादर करणे अपेक्षित असते. परंतु या प्रकरणात या प्रशासकीय क्रमाचे पूर्णपणे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

**३) वर्क ऑर्डर आणि शहानिशा न करताच देयके पारित? :** काही वाâमांची देयके व नस्ती यापूर्वीच मंजूर होऊन देयके अदा झाल्याचे समोर आले आहे. सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी नसणे आणि वर्क ऑर्डरशिवाय काम पूर्ण झाल्याचा दावा केला जाणे यावरून गंभीर संशय निर्माण झाला आहे.

**४)कोविड काळातील संशयास्पद कामे :** तक्रारीमध्ये नमूद कामे सन २०१९ आणि २०20 मधील कोविड काळातील आहेत. बराच कालावधी उलटून गेल्यामुळे आणि तत्कालीन अधिकाऱ्यांकडून समाधानकारक स्पष्टीकरण न मिळाल्यामुळे ही कामे प्रत्यक्ष झाली की नाही, याची खात्री समिती करू शकलेली नाही.

**५) एकाच कामाचे तुकडे आणि लाखो रुपयांची उचल :** कंत्राटदाराला फायदा पोहोचवण्यासाठी एकाच कामाचे तुकडे करून कामे दाखवण्यात आल्याचा संशय आहे.

संबंधित कंत्राटदाराला या दोन वर्षात एकूण ४८,९०,८४०/- अदा करण्यात आल्याचे देयकांवरून उघड झाले आहे.

**६) नियमबाह्य निविदा व जीएसटीचा अभाव:** कंत्राटदाराने प्रत्येक वेळी तीन निविदा सादर केल्या, परंतु यातील दोन निविदांवर जीएसटी क्रमांकच नव्हता, जी बाब पूर्णपणे नियमबाह्य आहे.

# बाळापूर शहरात तिरंगा पद यात्रा संपन्न




प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**बाळापूर :** नगर परिषद व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद बाळापूर नगर यांच्या समन्वयातून ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आज भव्य १०१ मीटर तिरंगा पद यात्रेचे आयोजन करण्यात आले. शहरांतील मुख्य बाजापेठेमधील जयस्तंभ चौक येथून तिरंगा पद यात्रेला सुरुवात करण्यात आली तेथून शाही चौक मस्जिद चौक, अंजुमन बाजार, जुनी चावडी, जैन मंदीर चौक, गुजरातीपूरा, कागजीपूरा मार्गे तिरंगा यात्रा पुन्हा जय स्तंभ चौकात परतून तिरंगा पदयात्रेची राष्ट्रगीत घेउन सांगता करण्यात आली. यावेळी तहसीलदार वैभव फरतारे, माजी नगराध्यक्ष जम्मू सेठ, नगर उपाध्यक्ष सुरेंद्र धोपटे, आरोग्य सभापती बलबिरसिंह खोरीया, बाळापूर नप कार्यालय अधीकक रमेश ठाकरे , लेखापाल बलरामसिंह नेकेले, प्रकल्प अधिकारी तैयब अहमद कादरी, प्रशासन अधिकारी कलीम, अजय काळे, अंदग कदम, मुरली देवकर, भरत बोदडे, झेंडा समन्वय समिति चे शामरावजी शेलार उमेशआप्पा भुसारी गणेश धोपटे रमेश लोहकरे अशोक मंडले, गजानन इंगळे, गजानन खारोडे, डॉ, फयाज, मोह्मदद अकरम, जयराम सोनोने.उपस्थित होते तसेच अ.भा. वि.प चे जिल्हा विद्यार्थी विस्तारक अनुराग जी बालेकर जिल्हा सह-संयोजक गणेश कापसे नगर मंत्री रितेश उमाळे नगर रितेश उमाळे विराट पेंदेले आकाश लोंढे सम्राट पेंदेले अर्जून गायकवाड व विद्यार्थी कार्यकर्ते व हितचिंतक रविकांत किल्लेकर उपस्थित होते. सोबतच शहरातील सर्व पत्रकार, विद्यार्थी, प्राध्यापक शिक्षक, नगर सेवक, प्रशासकीय कर्मचारी विविध पदाधिकारी प्रतिष्ठीत नागरिकांच्या उपस्थितीत पदयात्रा उत्साहात पार पडली. या माध्यमातुन राष्ट्रीय एकतेचा संदेश देण्यात आला.

# स्वातंत्र्यदिनी एकता दौड मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

## अकोलखेड अंबोडा मोहाळा संयुक्त मित्र परिवाराचा पुढाकार

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अकोट :** अकोट तालुक्यातील क्रीडा क्षेत्राकरिता अग्रगण्य असलेले अकोलखेड मोहाळा व आंबोडा येथील मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमानाने

दि. १५ऑगस्ट ठीक सकाळी ९ वाजता स्थळ मोहाळा फाटा रूट मोहळा ते आंबोडा असे राहणार असून स्वतंत्र दिनानिमित्ताने आयोजित एकता दोड मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे या मॅरेथॉन स्पर्धेची अंतर १६०० मीटर राहणार आहे या स्पर्धेत खुला गट फक्त मुले शंभर रुपये शुल्क आकारण्यात आली आहे तरी या होणाऱ्या स्पर्धे करता बक्षिसांची जंगी लूट ठेवली असून प्रथम क्र.७००१/-स्व. हिदायतजी पटेल द्वितीय क्र. ६००१/राजेश सावरकर नागेश सावरकर, तृतीय क्र.५००१/ मनीष कराळे, चतुर्थ क्रमांक क्र. ४००१/जगन्नाथ निचळ. पाचवा क्र. ३००१/जगदीश शिवरकार, सहावा क्र. २००१/ कुलदीप वसू सातवा क्र. १५०१/-विठल सावरकर,आठवा क्र.१००१/ ज्ञानदेव सावरकार ,नववा क्र.

७०१/-प्रमोद रायबोले. दहावा क्र. ५०१/-ऋषी तेल्हारकर . असे स्पर्धकांसाठी बक्षीस वितरण आयोजन केले आहे स्पर्धकांसाठी सूचना १) मॅरेथॉन दरम्यान स्पर्धकाला झालेल्या कोणत्याही शारीरिक हानीस पंच जबाबदार राहणार नाही. २)पंचाचा निर्णय अंतिम राहील.

३) ऑगस्ट नंतर नाव नोंदणी घेतल्या जाणार नाही.

४)सहभागी प्रत्येकास रनिंग साठी लागणारी भेटवस्तू दिली जाणार. मार्गदर्शक आदित्य तळोकार सर,नोंदणी नाव नोंदणीसाठी खालील नंबर वर आपले नाव मोबाईल नंबर व आधार कार्ड पाठवा..आणि खालील दिलेल्या नंबर वर स्क्रीन शॉट पाठवा...

अधिक माहितीसाठी संपर्क :

9067490183 / 9881082650 / 8767320720

स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेण्याचे आयोजकाचे आवाहन.

# भारतीय स्वातंत्र्यदिनाचा मुख्य शासकीय समारंभ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अकोला :** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त मुख्य शासकीय समारंभ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी ९.०५ वा. होणार आहे. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण होईल.

यादिवशी ८.३५ ते ९.३५ या वेळेत इतर कोणताही शासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. ध्वजस्तंभाची रंगरंगोटी, परिसराची, तसेच प्रमुख मार्गांची स्वच्छता आदी कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कार्यालये, आस्थापना, प्राधिकरणांनी व इतर संस्थांनी ध्वजारोहणप्रसंगी ध्वजसंहितेचे पालन करावे. जीर्ण, खराब झालेले, माती लागलेले राष्ट्रध्वज गोळा करून ते तालुका व जिल्हा स्तरावरील यंत्रणेकडे सुपुर्द करावेत. राष्ट्रध्वजांची परस्पर विल्हेवाट लावू नये. तसे केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश देण्यात आले आहेत.

**स्वातंत्र्यदिनी केंद्रीय विद्यालयाचा प्रवेशोत्सव**

`अकोला येथे केंद्रीय विद्यालयाची स्थापना झाली असून, पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या उपस्थितीत विद्यालयात प्रवेशोत्सव दि. १५ ऑगस्टला साजरा होणार आहे. मुख्य ध्वजारोहण समारंभानंतर सकाळी १० वा. हा कार्यक्रम होईल.`

# आता वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आंदोलनांमध्ये भाग घेण्यास मनाई

## माध्यमांना माहिती देण्यावर सुद्धा बंदी

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अकोला:** सरकारने एक नवीन सरकारी आदेश जारी केला असून, त्याद्वारे सरकारी आदिवासी विद्यार्थी वसतिगृहांच्या प्रवेश नियमांमध्ये मोठे बदल करण्यात आले आहेत. या आदेशानुसार, विद्यार्थी केवळ वसतिगृहाशी संबंधित समस्यांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडेच देऊ शकतील.

**सरकारी आदेश आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक आहे- आदिवासी संघटना**

त्यांना माध्यमांकडे तक्रारी किंवा निवेदने सादर करता येणार नाहीत. याशिवाय, कोणत्याही संघटनेत सामील होण्यास, उपोषणासारख्या आंदोलनांमध्ये सहभागी होण्यास किंवा इतर विद्यार्थ्यांना संपासाठी प्रवृत्त करण्यासही मनाई आहे. तसेच, वसतिगृह प्रवेशासाठी कमाल वयोमर्यादा २६ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये इतर अनेक अटींचाही समावेश आहे.

या अटी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक असल्याचे सांगत, विविध आदिवासी संघटनांनी या सरकारी आदेशाविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे, हा आदेश रद्द करण्याची किंवा त्यात शिथिलता आणण्याची मागणी केली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहातील शिक्षण व्यवस्थेत समाविष्ट करण्यासाठी सरकार विविध योजना राबवते, ज्यामध्ये वसतिगृहे ही एक महत्त्वाची योजना आहे. दुर्गम आणि पोहोचण्यास कठीण भागांतील आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी वसतिगृहांमध्ये प्रवेश घेतात, तर अनेक विद्यार्थी आश्रम शाळांमध्ये राहून आपले शिक्षण पूर्ण करतात.

# शिवपुरात 17 ऑगस्टला चैनुजी महाराज नागपंचमी यात्रा महोत्सव

## यात्रेत सजवलेल्या पालख्या व ढोल नगारे भजनी मंडळ आकर्षण



प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अकोट :** अकोट तालुक्यातील शिवपुर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री चैनुजी महाराज नागपंचमी यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या यात्रेला पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंदिर विश्वस्त आयोजन समिती व ग्रामस्थांनी केले आहे.

सोमवार, १७ ऑगस्ट रोजी सकाळी विधी नुसार अभिषेक पूजन आरत्या चैनुजी महाराजांच्या मूर्तीची सजवलेल्या पालखीमध्ये नागदेवतेची मूर्त विराजमान करून गावातून पालखीतून ढोल नगारे टाळ मृदुंग च्या गजरात वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. पालखी मंदिरात पोहोचल्यानंतर पूजा, अर्चना व आरती गोपाळ काला होणार असून, त्यानंतर दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेत पंचक्रोशीतील भाविकांसह भजनी मंडळे, दिंड्या, डफडे पथक, व्यावसायिक, दुकानदार आणि आकाशी पाळणे व्यावसायिकांनी सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजन समितीकडून करण्यात आले आहे. स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाकडून यात्रेत येणाऱ्या भाविकांकरता रोडच्या दोन्ही साईडला जेसीबी द्वारे साफसफाई केल्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये ब्लिचिंग जंतुनाशक विरहित औषध टाकण्यात आली व गावातील साफसफाई करून गवतावर तननाशक व डासनाशक फवारणी केली, भाविकांनी श्री चैनुजी महाराजांचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री चैनूजी महाराज संस्थान विश्वस्त यात्रा आयोजन समिती कडून सर्व भाविकांना आवाहन करण्यात आले , १७ व १८ ऑगस्ट असे दोन दिवस यात्रा भरणार आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी अकोट आगाराकडून अकोट ते शिवपुर मार्गावर अतिरिक्त बसफेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी समस्त शिवपुर ग्रामस्थ विश्वस्त संस्थान यात्रा आयोजन समिती परिश्रम घेत आहेत.

# अकोट-अंजनगाव रोडवर दोन कारची समोरासमोर धडक; तिघे गंभीर जखमी

वि. प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अकोट :** अकोट-अंजनगाव मार्गावरील पठार नाल्यानजीक गुरुवारी (दि. १३) दुपारी साडेदोन ाजताच्या सुमारास दोन कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात तिघेजण गंभीर जखमी झाले. एका दुचाकीस्वारास वाचविण्याच्या प्रयत्नात हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोटकडून अंजनगावकडे



एमएच-२८-बीक्यू-५१८८ क्रमांकाची ट्रिबर कार जात होती. त्याचवेळी अंजनगावकडून अकोटकडे वॅगनर आर कार येत होती. पठार नाल्याजवळ अचानक समोर आलेल्या दुचाकीस्वारास वाचविण्याच्या प्रयत्नात दोन्ही वाहनांची समोरासमोर जबर धडक झाली. या भीषण अपघातात तिघेजण जखमी झाले असून दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतीस धाव घेत जखमींना अकोट येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना अकोला येथे हलविण्यात आले. दरम्यान, अपघातग्रस्त वाहनांपैकी एका चारचाकीत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याचा माल असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आल्याची चर्चा घटनास्थळी रंगली होती.

# गवळीपुरा भागात घराला आग सुदैवाने मोठी हानी टळली

**अकोला :** येथील गवळीपुरा भागात शहीद अब्दुल हमीद चौकातील एका घराला गुरूवारी रात्री अचानक आग लागली. आगीमध्ये घरातील सामान जळून खाक झाले. परंतु घरातील लोकांना सुरक्षित बाहेर काढले. आजुबाजूच्या लोकांनी पाणी टाकून आग आटोक्यात आणली. तसेच अग्निशमन दलाची गाडी देखील वेळेत पोहोचली. त्यामुळे आग इतरत्र पसरली नाही. आग नियंत्रणात आणण्यासाठी परिसरातील युवकांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## निधन वार्ता

**प्रदीपबाप्पू देशमुख**



**पातूर :** ज्येष्ठ पत्रकार प्रदीपबाप्पू देविदासपंत देशमुख यांचे १३ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे. जिल्हा पत्रकार संघाने त्यांना श्रद्धांजली वाहिली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# पत्नीच्या खूनप्रकरणी पतीला जन्मठेप

प्रतिनिधी १४ ऑगस्ट



**यवतमाळ :** घाटंजी तालुक्यातील पंगडी येथील पत्नीच्या खूनप्रकरणी पतीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एल. यावलकर यांनी १३ ऑगस्ट २०२६ रोजी हा निकाल दिला.

संतोष गुरुदेव ठाकरे (वय २९, रा. पंगडी, ता. घाटंजी) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. १० ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी पत्नीने अपमानास्पद शब्द वापरल्याच्या रागातून तसेच अन्य कारणांमुळे संतोष ठाकरे याने कुऱ्हाडीने तिच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने तिचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे, घटनेनंतर आरोपीनेच पोलिसांना याबाबत माहिती दिली होती.

या प्रकरणी घाटंजी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४९५/२०२१ अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पूर्ण करून पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

खटल्यादरम्यान सरकारी पक्षातर्फे आठ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, तपास अधिकारी तसेच उपलब्ध दस्तऐवजी पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्धचा खूनाचा गुन्हा सिद्ध झाला. त्यानंतर न्यायालयाने संतोष ठाकरे याला कलम ३०२ अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

> ■ या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त शासकीय अभियोक्ता नरेंद्र एन. पांडे यांनी काम पाहिले. गुन्ह्याचा तपास घाटंजी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मनिष शांताराम दिवटे यांनी केला. न्यायालयीन कामकाजात महिला पोलिस हेड कॉन्स्टेबल सारिका बोधनकर यांनी मदत केली.

# उमरखेड वन विभागाला मिळणार 'संजीवनी'!

## जीर्ण इमारतींच्या जागी अद्ययावत वन संकुल; मरसूळ इकोटुरिझम प्रकल्पालाही गती

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**उमरखेड :** शहरातील जीर्ण झालेल्या वन विभागाच्या कार्यालये आणि कर्मचारी निवासस्थानांच्या जागी नवीन व अद्ययावत वन संकुल उभारण्याच्या कामाला आता गती मिळणार आहे. उमरखेड-महागाव मतदारसंघाचे आमदार इंजि. किसनराव मारोती वानखेडे यांच्या मागणीवरून वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली १२ ऑगस्ट रोजी मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत याबाबत महत्त्वाचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत उमरखेड-महागाव मतदारसंघातील वन विभागाच्या प्रलंबित प्रश्नांसह अद्ययावत कार्यालयीन इमारती आणि मरसूळ येथील प्रस्तावित इकोटुरिझम प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चा झाली. बैठकीला अपर मुख्य सचिव (वने), प्रधान मुख्य वनसंरक्षक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), मुख्य वनसंरक्षक (यवतमाळ), उपवनसंरक्षक (पुसद) तसेच नगरविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा म्हणाले, उमरखेड शहरातील तहसील कार्यालय परिसरातील प्रशासकीय भवनासह पोस्ट बिल्डिंग, पोलिस स्टेशन वसाहत, बसस्थानक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय, पंचायत समिती इमारत आणि उपजिल्हा रुग्णालयाची कामे प्रगतिपथावर आहेत. मात्र वन विभागाची कार्यालये व कर्मचारी वसाहत जीर्ण अवस्थेत होती. पावसाळ्यात कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आमदार वानखेडे यांनी वनमंत्र्यांकडे बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावल्याचे त्यांनी सांगितले.

**मरसूळ इकोटुरिझमला चालना :** मरसूळ येथे प्रस्तावित इकोटुरिझम प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) तातडीने तयार करून मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देशही वनमंत्र्यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

**निसर्ग पर्यटनाला चालना :** या प्रकल्पामुळे परिसरातील निसर्ग पर्यटनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.




### सात दिवसांत इतिवृत्त

■ वन विभागाशी संबंधित सर्व प्रलंबित कामांवर तातडीने कार्यवाही करून सात दिवसांत त्याचे इतिवृत्त सादर करण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले. त्यामुळे उमरखेड वन विभागाच्या रखडलेल्या कामांना आता गती मिळण्याची शक्यता आहे.

■ "उमरखेड-महागाव मतदारसंघातील वन विभागाच्या इमारतींचा प्रश्न आणि पर्यटन विकासाला चालना देणारा मरसूळ इकोटुरिझम प्रकल्प पूर्ण करण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यामुळे प्रशासकीय सोयीसुविधा अद्ययावत होऊन निसर्ग पर्यटनाला मोठा वाव मिळेल." अशी प्रतिक्रिया आमदार किसन वानखेडे यांनी दिली.

### जीर्ण इमारतींचा प्रश्न मार्गी

■ उमरखेड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ उपविभागीय वनअधिकारी, वनपरीक्षेत्र अधिकारी, वनक्षेत्रपाल व वन्यजीव अधिकारी यांची कार्यालये तसेच कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आहेत. या इमारती अत्यंत जीर्ण झाल्या असून पावसाळ्यात परिसरात पाणी साचून धोकादायक परिस्थिती निर्माण होत असल्याची बाब आमदार वानखेडे यांनी बैठकीत मांडली.

■ या जागेवर नगरविकास विभागाच्या विकास आराखड्यात व्यापारी संकुलाचे आरक्षण असल्याने बांधकामाला अडथळा निर्माण झाला होता. न्यायालयाने जागेच्या मालकी हक्काबाबत शासनाच्या बाजूने निर्णय दिल्याने नगरविकास विभागाशी समन्वय साधून आरक्षणाचा अडथळा तातडीने दूर करण्याचे निर्देश अपर मुख्य सचिवांना देण्यात आले.

# अल्पवयीन मुलीला पळवून नेणारा आरोपी जेरबंद

## बोरी पोलिसांच्या गुन्ह्यातील आरोपीला डी.बी. पथकाने पकडले

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**यवतमाळ :** नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील बोरी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याच्या गुन्ह्यातील आरोपीला यवतमाळ शहर पोलिसांच्या गुन्हे प्रगटीकरण पथकाने अटक केली.

पवन सुभाष नन्नावरे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. यवतमाळ शहर पोलिसांचे डी.बी. पथक १३ ऑगस्ट रोजी पेट्रोलिंग करीत असताना बोरी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी यवतमाळ शहराच्या हद्दीत फिरत असल्याची माहिती मिळाली.



बोरी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५९९/२०२६, कलम १३७(२) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल आहे.

पोलिस निरीक्षक निलेश सुरडकर यांना माहिती देण्यात आल्यानंतर त्यांच्या आदेशाने आरोपीचा शोध घेण्यात आला. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी गडिया मंदिराजवळील सेजल रेसिडेन्सी परिसरात असल्याचे समोर आले.

त्यानंतर डी.बी. पथकाने परिसरात सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिस पथकाने पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. आरोपीला यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात आणल्यानंतर पुढील कारवाईसाठी बोरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी आणि पोलिस निरीक्षक निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत गुन्हे प्रगटीकरण पथकाचे पोलिस उपनिरीक्षक गणेश सपकाळ, पोलिस उपनिरीक्षक प्रितम पिंपळकर, बोरी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक, पोलिस हवालदार रावसाहेब शेंडे, पोलिस शिपाई गौरव ठाकरे, प्रदीप कुरडकर, पवन नांदेकर, मयूर तेल्लेवार तसेच पोलिस मित्र सनी चव्हाण आणि प्रणय रामटेके सहभागी झाले.

# एटीएम कार्डची अदलाबदल; २८ हजारांची फसवणूक

## मदतीच्या बहाण्याने पिन क्रमांक हेरला; अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**उमरखेड :** एटीएममधून पैसे काढताना मदतीच्या बहाण्याने एका अनोळखी व्यक्तीने ५० वर्षीय व्यक्तीचा पिन क्रमांक हेरून एटीएम कार्डची अदलाबदल केली. त्यानंतर त्यांच्या बँक खात्यातून तब्बल २८ हजार रुपये काढून घेतल्याची घटना तुसद रोडवरील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय)च्या एटीएम केंद्रात घडली.

याप्रकरणी शेषराव शेषराव (वय ५०, रा. करोडी, ता. हदगाव, जि. नांदेड; सध्या रा. मोहननगर, उमरखेड) यांनी उमरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून अनोळखी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेषराव हे ११ ऑगस्ट रोजी सायंकाळी एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी एटीएम केंद्रात असलेल्या अनोळखी व्यक्तीने 'कार्ड टाकल्यामुळे मशीन लोड घेत आहे,' असे सांगत त्यांना मदतीचे भासविले. याच दरम्यान त्याने चलाखीने शेषराव यांचा पिन क्रमांक हेरला. नंतर नजरचुकीचा फायदा घेत त्यांच्या हातातील मूळ एटीएम कार्ड काढून घेत त्याऐवजी दुसरेच कार्ड दिले. त्यानंतर संबंधित व्यक्तीने त्यांच्या खात्यातून टप्प्याटप्प्याने २८ हजार रुपये काढले. मोबाईलवर रक्कम काढल्याचा संदेश आल्यानंतर तसेच हातातील कार्ड वेगळे असल्याचे लक्षात आल्यानंतर फसवणूक झाल्याचे शेषराव यांच्या लक्षात आले.

या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी अपराध क्रमांक ७५१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६ व ३१८ नुसार गुन्हा दाखल केला आहे. एटीएम केंद्रातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

**अनोळखी व्यक्तीची मदत घेऊ नका :** एटीएममधून पैसे काढताना अनोळखी व्यक्तीची मदत घेऊ नये. पिन क्रमांक कोणालाही सांगू नये. व्यवहार पूर्ण होईपर्यंत एटीएम कार्ड स्वतःकडे सुरक्षित ठेवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा

## प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर टाळा - जिल्हाधिकारी

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**यवतमाळ :** स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन आणि महाराष्ट्र दिन हे राष्ट्रीय सण देशभरात उत्साहात साजरे केले जातात. या दिवशी राष्ट्रध्वजाचा योग्य सन्मान राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करताना नागरिकांनी प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

राष्ट्रध्वज हा देशाच्या अस्मितेचे प्रतीक असल्याने त्याचा कोणत्याही प्रकारे अवमान होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी, जागरूक नागरिक, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, आरोग्य संस्था तसेच विविध खासगी संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजांचा वापर होणार नाही, यासाठी संबंधितांनी स्थानिक पोलिस यंत्रणेच्या मदतीने आवश्यक ती खबरदारी घ्यावी. तसेच विक्रेत्यांनी प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजांची विक्री करू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, वापरात आलेले किंवा आढळून आलेले प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज रस्त्यावर अथवा कचऱ्यात न टाकता संबंधित तहसीलदार कार्यालय किंवा नगरपालिका कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात नागरिक आणि विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाचा योग्य सन्मान राखत प्लॅस्टिकच्या ध्वजांचा वापर पूर्णपणे टाळावा, असे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी स्पष्ट केले आहे.

# उर्दू हायस्कूलमध्ये २७० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत आरोग्य शिबीर

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**फुलसावंगी :** येथील जे. एस. पी. एम. उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्समध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) आरोग्य कार्यशाळा व तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात शाळेतील २७० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

शिबिरात विद्यार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी करून त्यांना विविध आरोग्यविषयक बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आरोग्याची काळजी कशी घ्यावी, स्वच्छता कशी राखावी, पौष्टिक आहाराचे महत्त्व तसेच नियमित व्यायामाचे फायदे याबाबत आरोग्य पथकाने माहिती दिली.

यावेळी डॉ. सुरज साबळे, डॉ. मोनिका बनसोड आणि औषधनिर्माता




फहीमोद्दीन नवाब यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. आवश्यक त्या आरोग्यविषयक सूचना देत विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याची नियमित काळजी घेण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद मुसद्दिक यांनी कौतुक केले. आरोग्य पथकाचे आभार मानताना विद्यार्थ्यांनी स्वच्छता, सकस आहार आणि नियमित व्यायाम यांना आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवावा, असे आवाहन त्यांनी केले.

# अपघात करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करा

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**आर्णी :** तालुक्यातील लोणबेहळ ते शेंदुरसनी रोडवर ट्रॅक्टर व दुचाकी अपघातात शेंदुरसनी येथील कल्याण पाटील वानखडे यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी ब्रह्मानंद अंबादास वानखडे व ग्रामस्थांनी गुरुवारी आर्णी ठाणेदार संजय खंदारे यांना निवेदन देऊन कंत्राटदार, चालक-मालकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ट्रॅक्टर हा एमएसईबीचे काम करणारा आहे. अपघातानंतर जखमीला रुग्णालयात नेण्याऐवजी चालक पसार झाला. सदर घटना गंभीर असताना कंत्राटदारानेही कोणतीच दखल घेतली नाही. अपघात घडला त्यावेळी ट्रॅक्टरला नंबर प्लेट नव्हती व लाईट बंद होते, असे निवेदनात नमूद आहे. अशा नादुरुस्त ट्रॅक्टरने शासकीय काम करून घेणे हा गुन्हा ठरतो. त्यामुळे चालकाला त्वरित अटक करावी व ठेकेदार, ट्रॅक्टर मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी ठाणेदारांकडे निवेदनातून करण्यात आली. निवेदन देतेवेळी परीक्षित वानखडे, विक्रम वानखडे, राहुल राठोड, पुंडलिक राऊत, अरविंद वानखडे, चंदन चव्हाण, संजय झांबरे आदी उपस्थित होते. कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# 'वॉक फॉर वॉटर'द्वारे जलसंधारणाचा संदेश

## 'रील फॉर सॉईल अँड वॉटर' स्पर्धा : क्यूआर कोड स्कॅन करा

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**यवतमाळ :** जलसंधारण दिनानिमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभरात 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी क्यूआर कोड स्कॅन करून ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले आहे.

मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा केला जाणार आहे. यानिमित्त 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर', जलसंधारणाची शपथ, युवकांसाठी लघुचित्रफीत स्पर्धा तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.

'महा वॉकेथॉन'मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर आधारित ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. २१ ऑगस्ट रोजी वॉकेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ई-प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. जलसंधारणाचा संदेश व्यापक करण्यासाठी सामाजिक माध्यमांवर # Maha Walkathon, #Walk For Water, #Save Soil SaveWater हे हॅशटॅग वापरण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

**१५ ते ३० वयोगटासाठी 'रील' स्पर्धा :** १५ ते २१ ऑगस्टदरम्यान जलसंधारण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'रील फॉर सॉईल अँड वॉटर कॉन्झर्व्हेशन' ही राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात येणार आहे. १५ ते ३० वर्षे वयोगटातील युवक-युवतींना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

स्पर्धकांनी 'Save Soil, Save Water, Secure Tomorrow' या विषयावर ३० ते ६० सेकंदांची 'इन्स्टाग्राम रील' तयार करायची आहे. रीलच्या सुरुवातीला स्वतःचे पूर्ण नाव, जिल्ह्याचे नाव आणि रीलचा उद्देश नमूद करणे आवश्यक आहे. स्पर्धकाने ही रील स्वतःच्या सार्वजनिक इन्स्टाग्राम खात्यावर प्रसिद्ध करून मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत इन्स्टाग्राम खात्याला टॅग करणे बंधनकारक आहे. तसेच #SaveSoilSaveWater हा अधिकृत हॅशटॅग वापरणे आवश्यक आहे.

**जलसंधारण अभियानाला सुरुवात :** १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत जलसंधारण अभियान राबविण्यात येणार आहे. जलसंधारण सप्ताह आणि त्यानंतरच्या अभियानातून मृद व जलसंधारणाबाबत राज्यभर जनजागृती करण्यात येणार असल्याचे मंत्री संजय राठोड यांनी सांगितले. मृद व जलसंधारण विभागाचे अधिकृत इन्स्टाग्राम, फेसबुक आणि 'एक्स' खात्यांवर या उपक्रमाची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# झरी-जामणीमध्ये भाजयुमोच्या शाखा फलकाचे अनावरण

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**झरी-जामणी :** झरी-जामणी तालुक्यात भारतीय जनता युवा मोर्चाच्या झरी (जामणी) शाखेच्या फलकाचे अनावरण उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजप तसेच भारतीय जनता युवा मोर्चाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाखेच्या फलकावर मार्गदर्शक म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकासमंत्री अशोक उईके, भाजपचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चव्हाण, भाजप महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी मंत्री मदन येरावार, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष सुरज गुप्ता, भाजयुमो महाराष्ट्राचे कृष्णराज महाडीक तसेच संजीवरेड्डी बोतकुलवार यांची नावे नमूद करण्यात आली आहेत.



यावेळी भाजपा मंडळ अध्यक्ष नागेश घुगुल, माजी भाजपा मंडळ अध्यक्ष सतीश नाकले, भाजपा महिला मंडळ अध्यक्ष शांताताई कापसे, विधानसभा प्रभारी परीक्षित आडे, विधानसभा प्रमुख धिरज भोयर, मंडळ प्रमुख शुभम इगडे, भाजयुमो मंडळ अध्यक्ष शुभम वडस्कर आणि भाजपा युवा उपाध्यक्ष सौरभ बुके यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

झरी-जामणी परिसरातील युवकांना संघटित करून त्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणे, युवकांशी संबंधित समस्या शासन दरबारी मांडणे तसेच भारतीय जनता पक्षाची विचारधारा आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सक्रियपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

शाखा फलकाच्या अनावरणामुळे झरी-जामणी परिसरातील युवा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

आगामी काळात युवकांच्या सहभागातून संघटन अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# संत गाडगेबाबा समाधी स्थळाच्या 25 कोटींच्या विकास आराखड्यास मंजुरी

## शिखर समितीच्या बैठकीतील निर्णय; आ. सुलभा खोडके यांच्या उपस्थितीत झाली होती बैठक

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अमरावती :** विदर्भातील प्रमुख धार्मिक व सामाजिक तीर्थक्षेत्र म्हणून प्रचलित असलेल्या अमरावती येथील संत गाडगेबाबा समाधी स्थळ परिसराच्या सुशोभीकरणासाठी २५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. या संदर्भात २० जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत आ. सुलभा संजय खोडके यांच्या उपस्थितीत शिखर समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता.



या निधीमुळे हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या समाधी स्थळांचा धार्मिक चेहरामोहरा बदलणार असून पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. संत गाडगेबाबा समाधीचा जीर्णोद्धार व परिसराचे सौंदर्यीकरणासह कुंताबाई समाधीचे सुशोभीकरण, कीर्तन सभागृह व ध्यान केंद्र तसेच विलोभनीय उद्यान अशी अनेक कामे अंतर्भूत असल्याची माहिती आमदार सुलभा खोडके यांनी दिली आहे. कीर्तनाच्या माध्यमातून गाडगेबाबांनी समाज प्रबोधनाचे कार्य केले. अमरावती येथील गाडगे नगर स्थित संत गाडगेबाबा समाधी स्थळ हे बाबांच्या क्रांतिदर्शी विचार व समाज प्रबोधनाची साक्ष देत असून हजारो अनुयायांचे ते प्रेरणास्थान बनले आहे. त्यामुळे संत गाडगेबाबा यांचे साहित्य व स्मृतीचे जतन करून समाधी स्थळाचा तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळाच्या धर्तीवर विकास व्हावा, यासाठी अमरावतीच्या आ. सुलभा खोडके यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून विकास आराखडा मंजूर करून निधी देण्याची मागणी केली. याची फलश्रुती म्हणून २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पात संत गाडगेबाबा यांचे गाडगे नगर येथील समाधी स्थळ असलेले तीर्थक्षेत्रासाठी २५ कोटींच्या निधीबाबत घोषणा करण्यात आली होती. दरम्यान २० जुलै रोजी आ. सुलभा खोडके यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीमध्ये अमरावती येथील संत गाडगेबाबा तीर्थस्थळाच्या विकास आराखडा बाबत आढावा घेण्यात आला. या बैठकीत आ. सुलभा खोडके यांनी सद्यस्थितीतील समाधीस्थळ येथील पूर्ण कामे, अर्धवट कामे यासह प्रस्तावित समाविष्ट कामासंदर्भात बैठकीमधून चर्चा केली. यावर मुख्यमंत्री महोदयांनी श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळाच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी देऊन या निधी अंतर्गत सर्व उर्वरित व प्रस्तावित कामे गतीने पूर्ण करण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनासोबत दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधून निर्देशित केले होते.

### जागतिक दर्जाच्या सुविधा होणार निर्माण

आता संत गाडगे बाबा समाधी स्थळ येथे जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील. ज्यामध्ये श्री संत गाडगे महाराज स्मृती केंद्रचे उर्वरित बांधकाम पूर्ण केले जाणार आहे. तसेच स्मृती भवन परिसरात 'शेतकरी ग्राम सफाई मिशन सेंटर'च्या तळमजल्याचे नवे बांधकाम. भाविकांच्या सोयीसाठी यात्री निवासाच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याचे बांधकाम. प्रबोधनासाठी अद्ययावत कीर्तन सभागृह व ध्यान केंद्र इमारत, अंतर्गत रस्ते, वाहनतळ आणि आकर्षक उद्यान उभारण्यात येतील. या निधीमुळे हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या समाधी स्थळांचा धार्मिक चेहरामोहरा बदलणार असून पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

# दिवसा घरफोडी करणारे दोन आरोपी ताब्यात

## गुन्हयातील संपुर्ण मुद्देमाल हस्तगत शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी १४ ऑगस्ट



**अमरावती :** दिवसा घरफोडी करणारे दोन आरोपी ताब्यात घेवून गुन्हयातील संपुर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात शहर गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. पो.स्टे. खोलापूरी गेट अमरावती येथे फिर्यादी नामे निलीमा राकेश आकरे, वय ४२ वर्षे, रा.प्रविण संकल्प, मालू लेआउट, रिंग रोड आकोली यांच्या घरी दिवसा घरफोडी होवून त्यात दोन मोबाईल तसेच सोन्याचे दागीने व नगदी असा मुद्देमाल चोरी झाला अशा फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन खोलापूरी गेट, अमरावती शहर येथे अपराध क्रमांक २४७/२६ कलम ३०५, ३३१(३) भा. न्या. स चा गुन्हा नोंद होता. गुन्हा घडल्यापासून गुन्हे शाखा, अमरावती शहर हे सदर गुन्हयाचा तपास करीत करीत होते.

घटनास्थळावरील तसेच इतर सि.सि.टी.व्ही. फुटेज चेक करण्यात आले तसेच गुप्त बातमीदार यांना सक्रीय करण्यात आले असता दिनांक १२/०८/२०२६ रोजी गुप्त बातमीदार यांचे कडून माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा चेतन संतोष वहीले, रा. बडनेरा याने केली आहे. ताब्यात घेण्यात आलेले आरोपी मध्ये चेतन संतोष वहीले, रा. जुनी वस्ती, बडनेरा, ता. जि. अमरावती, यश कैलास यादव, रा. वडद, ता.जि. अमरावती यांचा समावेश आहे. आरोपितांकडून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल ३०,०००/-रु.= एक काळया व पिवळया धातूच्या मण्यांची लहान पोत, वजन अंदाजे ५ ग्रॅम, ७,०००/- रु.= एक पांढ-या धातूचा बिछवा (आकडा) ३,०००/- रु चांदीचे जोडवे ३ नग /- 5. सॅमसंग कंपनीचा जुना वापरता ॲण्ड्रॉईड मोबाईल, ५००/- रु एक नोकीया कंपनीचा जुना वापरता साधा मोबाईल , ३०,०००/-रु. हीरो होन्डा सि.डी. डॉन काळया रंगाची गाडी कं. MH27-S-4234 (आरोपीतांनी गुन्हा करतेवेळी वापरलेली मोटर सायकल) एकूण ७७,५००/-रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त शाम घुगे, प्रांजली सोनावणे पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), मा. सहायक पोलीस आयुक्त (राजापेठ विभाग) संजय खताळे यांचे मार्गदर्शनाखाली व.पो. नि. दिनेश दहातोंडे सा, पो.नि. अतुल वर सा., सपोनि मनीष वाकोडे, सपोनि दशरथ आडे, सहा. पोउपनि फिरोज खान, पो. हवा. मंगेश लोखंडे, पो. हवा. संभाजी केन्द्रे, पो. हवा. संजय भारसाकळे, पो. हवा. नाझिमोद्दीन सैयद, पो. ना. सचिन भोयर, पोलीस अमलदार रंजित गावंडे, नरेश मोहरिल, सूरज चव्हाण, सागर ठाकरे, निखील गेडाम, चालक - चेतन शर्मा, प्रभात पोकळे गुन्हे शाखा, अमरावती शहर तसेच पो.स्टे. सायबर येथील म.पो. कॉ. सुषमा आठवले यांनी केलेली आहे.



नवी दिल्ली येथे लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांची आमदार रवी राणा व भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी घेतली सदिच्छा भेट दिली.

# बँकिंग क्षेत्रात तातडीने 5 दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करा!

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अमरावती:** बँक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागणीसाठी 12 ऑगस्ट रोजी देशव्यापी निदर्शने केली. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स ने वज्रमूठ मजबूत करीत दिला सामूहिक ऐक्याचा परिचय दिला. पाच दिवसांचे बँकिंग - हा आमचा अधिकार आहे.

शांतता - शिस्त - नियोजन या त्रिसूत्रीचा अवलंब करीत युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स ची बँक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर विलंब न करता सकारात्मक निर्णय घ्या. या मागणीचा एकजुटीने पुनरोच्चार केला.





यु. एफ. बी. यु. अर्थातच युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स ही भारतातील प्रमुख बँक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या युनियनची सर्वोच्च शिखर संघटना म्हणजेच umbrella बॉडी आहे. बँकिंग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे प्रश्न, wage revision म्हणजेच वेतन करार आणि विविध मागण्यांसाठी ही संघटना सर्व बँक संघटनांना एकत्र करून राष्ट्रीय पातळीवर आंदोलने व वाटाघाटी करते.युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स मध्ये 7 प्रमुख बँक कर्मचारी आणि अधिकारी संघटनांचा समावेश आहे. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स अर्थातच यु. एफ. बी. यु. केंद्र सरकार आणि इंडियन बँक्स असोसिएशन म्हणजेच आय. बी. ए. यांच्याकडे भारतातील सर्व सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील बँकांसाठी 5 दिवसांचा कामाचा आठवडा म्हणजेच सोमवार ते शुक्रवार अधिकृतपणे मंजूर करून लागू करण्यासाठी जोरदार दबाव आणत आहे. आर. बी. आय., एल. आय. सी., जी. आय. सी., केंद्र सरकारी कार्यालये आणि स्टॉक एक्सचेंजमध्ये आधीपासूनच लागू असलेल्या नियमांनुसार सर्व शनिवार आणि रविवार कायमस्वरूपी सुट्टी म्हणून घोषित करावेत. अशी बँक कर्मचारी संघटनांची मागणी आहे. बँकिंग क्षेत्रात तातडीने 5 दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करा! तसेच बँक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी बुधवार दिनांक 12 ऑगस्ट 2026 रोजी संपूर्ण देशभरात देशव्यापी निदर्शने करण्यात आली.

यासोबतच अमरावती येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर समीप इर्वीन चौक येथे प्रमुख मागण्यांना घेऊन " पाच दिवसांचे बँकिंग - हा आमचा अधिकार आहे.बँक कर्मचाऱ्यांनी केंद्र सरकारला असा स्पष्ट संदेश देत आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी आवाज बुलंद केला होता. बँकिंग क्षेत्रात तातडीने 5 days banking लागू करा, शनिवार व रविवार साप्ताहिक सुट्टी जाहीर करा, 5 days banking बाबत झालेल्या पूर्वीच्या करार / प्रतिबद्धतेची तातडीने अंमलबजावणी करा, बँक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर विलंब न करता सकारात्मक निर्णय घ्या. या मागण्यांना घेऊन यावेळी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियनच्या वतीने मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली.

# जिल्हास्तरीय रेड रन स्पर्धा संपन्न

## मुलांमध्ये पियुष मसाने तर मुलींमध्ये वैष्णवी वानखडे प्रथम

प्रतिनिधी १४ ऑगस्ट





**अमरावती:** आज पासून साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवा पंधरवाडा निमित्य जिल्हा स्तरीय रेड रन स्पर्धा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती, आर डी आई के महाविद्यालय बडनेरा व राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या संयुक्त विद्यामाने मा. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ विनोद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केल्या गेली होती. सदर स्पर्धेचे सुरुवात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.विनोद पवार ,डॉ.देशमुख प्राचार्य आर डी आय के महाविद्यालय डॉ. प्रो. अतुल पाटील, श्री. अजय साखरे जिल्हा जिल्हा कार्यक्रम अधिकारी, प्रा. नकुल देशमुख, प्रा प्रिती देशमुख श्री. प्रकाश शेगोकार जिल्हा पर्यवेक्षक यांच्या उपस्थिती मध्ये हिरवी झेंडी दाखवून करण्यात आली. सदर स्पर्धेयेतील प्रथम व द्वितीय विजेत्याला या महिन्यात होणाऱ्या राजस्तरीय स्पर्धे साठी निवड झालेली असून ते त्या स्पर्धे मध्ये भाग घेतील.

या स्पर्धे मध्ये जिल्ह्यातील महाविद्यालय मधील रेड रिबन क्लब च्या सदस्यांन सोबतच इतर विध्यार्थ्यानी सहभाग नोंदवीला. या वेळी मार्गदर्शन करताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ विनोद पवार यांनी एच आई व्ही ची संक्रमाणाची तीव्रता कमी करण्यासाठी झालेल्या जनजागृती मध्ये युवकांची भूमिका फार महत्वाची आहे असे सांगितले, व होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धे मध्ये सहभागी होणा साठी शुभेच्छा दिल्या या वेळी या स्पर्धेचे नियम, मार्ग आणि मार्गदर्शन प्रा. अतुल पाटील यांनी केले.

या स्पर्धे मध्ये पुरुष गटातून प्रथम पियुष मसाने श्यामा प्रसाद मुखर्जी महाविद्यालय शेंदुरजना घाट, द्वितीय प्रज्वल हटले श्यामा प्रसाद मुखर्जी महाविद्यालय शेंदुरजना घाट, तृतीय शंकर नांदे तक्षशीला महाविद्यालय अमरावती यांनी तर महिला मध्ये प्रथम क्रमांक वैष्णवी वानखडे आर डी आय के महाविद्यालय बडनेरा, द्वितीय मीनाक्षी खारपाटे जनाबाई नाथे विद्यालय अचलपूर, तृतीय निशा जगताप महीला महाविद्यालय अमरावती यांनी मिळवले.

# स्वातंत्र्य दिनी मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते ध्वजवंदन



**अमरावती :** भारतीय स्वातंत्र्याच्या 79व्या वर्धापन दिनानिमित्त शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे. येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात शनिवार, दि. 15 ऑगस्ट रोजी सकाळी 9.05 वाजता हा मुख्य शासकीय कार्यक्रम होणार आहे. स्वातंत्र्यदिन समारंभास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

# स्वातंत्र्यदिनी 'महा रक्तदान शिबिराचे' आयोजन

**अमरावती :** महा रक्तदान शिबिराचे आयोजन शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता हॉटेल ग्रँड महफिल येथील रुबी हॉल येथे करण्यात आले आहे. राज्य उत्पादन शुल्क आणि अमरावती जिल्हा मद्य विक्रेता संघटना यांच्या वतीने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

'रक्तदान - शहिदों के नाम' अशी संकल्पना या शिबिराची ठेवण्यात आली आहे. या शिबिराचे आयोजन राज्य उत्पादन शुल्कचे विभागीय उपायुक्त डॉ. पराग नवलकर, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक शशिकांत गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. तसेच, महा रक्तदान शिबीर आयोजन समितीचे अध्यक्ष नितीन देशमुख, उपाध्यक्ष अनिल भामोरे, दीपक गुडधे, विजय जयस्वाल, सुरेश चांदवानी, बाबूसेठ मतानी आणि इतर सर्व पदाधिकारी व सदस्यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्य दिनी रक्तदान करून आरोग्य यज्ञात सहभागी व्हावे, तसेच राष्ट्रसेवा आणि मानवसेवेचे कार्य करावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बुलढाण्यातील तरुणांचे अमरावतीत हाय-व्होल्टेज आंदोलन

## सातुर्णा येथे एका तरुणाने मोबाईल टॉवरवर चढला

प्रतिनिधी १४ ऑगस्ट



**अमरावती:** बुलढाण्यातील तरुणांचे अमरावतीत हाय-व्होल्टेज आंदोलन केले असून सातुर्णा येथे एका तरुणाने मोबाईल टॉवरवर चढला आहे.

विविध मागण्यांसाठी आंदोलन केले. सारंगपूर ग्रामपंचायतीचे रहिवासी गजानन बोरकर यांची ओळख झाली. आंदोलक सेनेचा कार्यकर्ता असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांना खाली उतरण्यास भाग पाडल्यास आत्महत्येची धमकी दिली. ग्रामपंचायतीच्या कामकाजात अनेक अनियमितता असल्याचा आरोप त्यांनी केले आहे. समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी केली आहे. पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहे. आंदोलकाला समजावून खाली उतरवण्याचे प्रयत्न पोलिसांनी केला आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या एक दिवस आधी झालेल्या आंदोलनामुळे गोंधळ निर्माण झाला आहे.

# मुथुट पिन कॉप कंपनी शाखा विमको टावर प्रकरणात सात दिवसाचा पीसीआर

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अमरावती :** मुथुट पिनक्राफ्ट गुन्हा प्रकरणात आरोपींवर सात दिवसात पीसीआर वाढवण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या आता पावेतोच्या तपासा चे अनुषंगाने घटनास्थळी सिस्टीम निरीक्षण पंचनामा करून पुरावे गोळा करण्यात आले आहे.

आरोपीचा PCR संपत असल्याने व आज पावेतो च्या केलेल्या तपासामध्ये सदर गुन्ह्यात एम पी आय डी कलम 3 वाढ करून यायालयासमोर आरोपीना हजर केले. न्यायालयाने आरोपींचा सात दिवस पीसीआर मंजूर केला आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडिया तर्फे 17 ऑगस्ट रोजी प्रथोट येथे 'कृषी कर्ज वितरण शिबीरा' चे आयोजन

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अमरावती:** शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी बँकिंग सुविधा त्यांच्या दारी पोहचविण्याच्या उद्देशाने सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्यावतीने 17 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 2.00 वाजता अचलपूर तालुक्यातील पथ्रोट येथील प्रसन्न लॉन येथे आयोजित करण्यात आला आहे.

शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांना विविध कृषी कर्ज योजना, बँकिंग सुविधा तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कृषीविषयक योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने बँकच्या राष्ट्रव्यापी मेगा कृषि आउटरीच कॅम्पचा हा भाग आहे. या एकदिवशीय शिबीरामध्ये शेतकऱ्यांना पीक कर्ज, कृषी मुदत कर्ज, कृषी यांत्रिकीकरण, सिंचन, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, कृषीपूरक व्यवसाय तसेच इतर कृषी व ग्रामीण कर्ज योजनांबाबत बँकेच्या मुंबई येथील केंद्रीय कार्यालय मुंबई उप महाप्रबंधक पुरुषोत्तम मीणा अमरावतीचे क्षेत्रीय प्रबंधक सुनील पाण्डेय मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरात पात्र शेतकऱ्यांकडून कर्ज प्रस्ताव स्वीकारले जातील आणि प्रलंबित कर्ज प्रकरणांचा आढावा घेण्यात येईल तसेच विविध बँकिंग व डिजिटल बँकिंग सुविधांची माहिती देण्यात येणार आहे.याशिवाय शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शेतकरी, कृषी उद्योजक, महिला बचत गट, एफपीओ तसेच ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी होऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेंट्रल बँक ऑफ इंडिया चे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी आले आहे.

# 21 ऑगस्टला 'वॉक फॉर वॉटर' वॉकेथॉन

## 15 ते 21 ऑगस्टदरम्यान 'जलसंधारण सप्ताह'; विविध उपक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**अमरावती :** जिल्ह्यात 15 ते 21 ऑगस्ट दरम्यान जलसंधारण सप्ताह राबविण्यात येणार आहे. या निमित्ताने आठवडाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 21 ऑगस्ट रोजी 'वॉक फॉर वॉटर -वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले असून नागरीकांनी मोठया संख्येत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. युवा पिढीच्या कल्पकतेला मंच उपलब्ध करून देत जलसंधारणावर आधारीत रील्ससाठी आकर्षक पारितोषिकही प्रदान करण्यात येणार आहेत.

मृद व जलसंधारण विभागामार्फत संपूर्ण राज्यात 15 ते 21 ऑगस्ट या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह' राबविण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातील आयोजनाच्या पूर्व तयारीसाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी आढावा घेतला. जिल्ह्यात जलसंधारण सप्ताह अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विविध उपक्रमांची घोषणाही केली. या अंतर्गत 'पाणी बचत' आणि 'जलसंधारणाचा व्यापक संदेश देण्या'साठी 21 ऑगस्ट रोजी 'वॉक फॉर वॉटर' ही विशेष वॉकेथॉन आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व नागरिक, तरुण, विद्यार्थी आणि शासकीय कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

जलसंधारण सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण जिल्ह्यात वृक्षलागवड, श्रमदान, जनजागृती कार्यक्रम, व्याख्याने तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये चित्रकला आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, सामाजिक संस्थांनी आणि विद्यार्थ्यांनी या सर्व उपक्रमांमध्ये व वॉकेथॉनमध्ये हिरिरीने सहभागी होऊन जलसंधारण सप्ताह यशस्वी करण्याचे आवाहन श्री. येरेकर यांनी केले आहे.

### सर्वोत्कृष्ट 'रील्स' बनवणाऱ्यांना 25 हजार रुपयांपर्यंतची पारितोषिके

युवा पिढीला या अभियानात जोडण्यासाठी आणि जलसंधारणाचा संदेश घरोघरी पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया 'रील्स स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. जलसंधारणावर आधारित सर्वोत्कृष्ट रील्स तयार करणाऱ्यांना जिल्हा प्रशासनातर्फे 25 हजारांचे प्रथम पारितोषिक, 15 हजारांचे द्वितीय तर 10 हजारांचे तृतिय पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार असल्याचे येरेकर यांनी सांगितले.

सिटी न्यूज वाशीम सुपरफास्ट
शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# विकासाचे धोरण अन् सौंदर्यीकरण....

# प्रमुख चौक, स्मारके व दुभाजकांचे सुशोभीकरण !

## पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते आज कोट्यवधीच्या विकास कामाचे लोकार्पण

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

शहराच्या सौंदर्यीकरणाला आणि ऐतिहासिक व सांस्कृतीला नवी झळाळी देण्याच्या उद्देशाने वाशिम नगर परिषदेच्या वतीने नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्या पुढाकाराने विविध नावीन्यपूर्ण विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. जिल्हा वार्षिक योजना नावीन्यपूर्ण योजना अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते शहर पोलिस स्टेशनपर्यंत दुभाजकाचे सौंदर्यीकरण, अकोला नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात करण्यात आलेल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक कामांचा लोकार्पण सोहळा शुक्रवार, आज रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कामांसाठी तब्बल १०१.३४, ९८.०० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.











या विकासकामांचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या शुभहस्ते होणार आहे. कार्यक्रमाला लोकसभा सदस्य संजय देशमुख व अनुप धोत्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशिम-मंगरुळनाथ विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे राहणार आहेत. या प्रकल्पांतर्गत पोलीस स्टेशन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दुभाजकाचे सुशोभीकरण, अकोला नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराचे सुशोभीकरण तसेच शिवाजी चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. ऐतिहासिक वारसा, सांस्कृतिक ओळख आणि शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या कामांमुळे प्रमुख चौकांचे रूप पालटणार आहे.दरम्यान, टेम्पल गार्डन विकासकामही प्रगतीपथावर असून, या कामामुळे शहरातील नागरिकांना अधिक चांगली सार्वजनिक जागा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. शहरातील प्रमुख चौक, रस्ते, दुभाजक आणि सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण करण्याच्या दृष्टीने नगर परिषदेने विविध कामांना गती दिली आहे. पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनातून वाशिम शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येत असून, सौंदर्यीकरणासोबतच पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य दिले जात आहे. 'विकासकामांना निधी, शहराच्या सौंदर्याला नवी दिशा आणि नागरिकांच्या सुविधांना प्राधान्य' या उद्देशाने सुरू असलेल्या कामांमुळे वाशिम शहराच्या विकासाला नवी ओळख मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. लोकार्पण सोहळ्यास विधान परिषद सदस्य भावनाताई गवळी, धीरज लिंगाडे, किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, विधानसभेचे आमदार अमित झनक, सईताई डहाके, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, नगर परिषद उपाध्यक्ष राजू विठोबा भांदुर्गे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे, सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापती राहुल मोतीराम तुपसांडे यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, नगर अभियंता निखिल चव्हाण, कंत्राटदार शंभु फायबर आर्ट, शेगाव तसेच नगर परिषदेचे सभापती, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने ही कामे पूर्णत्वास आली आहेत. वाशिम शहराच्या सौंदर्यीकरणाचा नवा अध्याय सुरू होत असून, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपत आधुनिक विकासाला चालना देणाऱ्या या कामांकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### रविवार पासून महामृत्युंजय जपयज्ञ !



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समिती,वाशिम तर्फे दरवर्षी श्रावण महिन्यात महामृत्युंजय जपयज्ञाचे आयोजन करण्यात येत असते.यावर्षी हा जपयज्ञ रविवार दिनांक १६/८/२०२६ ते रविवार दिनांक २३/८/२०२६ या कालावधीत सकाळी ठीक ६ ते ७ या कालावधीत श्री.मध्यमेश्वर संस्थान वाशिम येथे होणार आहे.श्रावण महिन्यात महामृत्युंजय मंत्राचा जप ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा मार्ग प्रशस्त करतो.आयुर्रारोग्य,सुखशांती आणि ऐश्वर्याचा विवेक निर्माण करतो.सर्व साधकांनी या जपयज्ञास उपस्थित राहून आनंदअनुभूती घेण्याचे आवाहन श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समितीने केले आहे.

### क्रीडा प्रबोधिनीत हँडबॉलसाठी प्रवेश चाचण्या १७ ऑगस्टपासून

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

अधिकाधिक आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तथा शिवछत्रपती क्रीडापीठ, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे यांच्या अंतर्गत कार्यरत क्रीडा प्रबोधिनींमध्ये सन २०२६-२७ या वर्षासाठी हँडबॉल खेळाच्या प्रवेशासाठी राज्यस्तरीय निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रतिभावान खेळाडूंची निवड करून त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार आणि अद्ययावत क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. सन २०२६-२७ साठी शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत आठ क्रीडा प्रबोधिनींमध्ये मे २०२६ मध्ये सरळ प्रवेश व खेळनिहाय कौशल्य चाचणी प्रक्रियेतून प्रवेश अंतिम करण्यात आले होते. आता पुनश्च एकदा राज्यस्तरावर निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

**सरळ प्रवेशासाठी १७ व १८ ऑगस्टला चाचणी**

हँडबॉल खेळाच्या सरळ प्रवेश प्रक्रियेसाठी १७ ते १८ ऑगस्ट २०२६ रोजी चाचणी घेण्यात येणार आहे. संबंधित खेळाडूंनी १७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजेपर्यंत चाचणी स्थळी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ही चाचणी विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर, कोराडी रोड, नागपूर येथे होणार आहे.

# १३ वर्षापासूनचा लढा, अतिक्रमण काढा !

## साहेब, वापरा नियम व कायदा, शासनाचा करा फायदा, संबंधितांवर गुन्हे दाखल करा - देव्हढे

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

येथील राजस्थान महाविद्यालयाने शासकीय जागेवर अतिक्रमण करून युजीसीच्या कोट्यवधीच्या अनुदानातून मुलींच्या वसतीगृहाची मोठ्ठी ईमारत बेकायदेशीर बांधली. शासनाच्या जागेवर अतिक्रमण करून बांधलेली वसतीगृहाची ईमारत चक्क वाशीमच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मुलींच्या वसतीगृहासाठी नियमबाह्य भाड्याने देवून भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे. १३ वर्षापासून अतिक्रमणेच्या जागेसाठी निवेदने आंदोलन करूनही महसुल मंत्र्याचे व जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र असूनही कारवाईसाठी वेळ लागत आहे. हा टाळाटाळीचा खेळ चालू असून हा मेळ कोण करीत आहे असा सवालही उपलब्ध होत आहे.





त्यामुळे नियम व कायद्या वापरून शासनाची जमीन शासनाला परत करून शासनाचा फायदा करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी केली आहे.

येथील राजस्थान शिक्षण मंडळामार्फत सुरू असलेल्या राजस्थान महाविद्यालयाने जवाहर नवोदय विद्यालयाला लागूनच असलेल्या शासकीय जागेवर अनेक वर्षापासून अतिक्रमण केलेले आहे.या शासकीय जागेवर राजस्थान महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतीगृहासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या कोट्यवधीच्या अनुदानातून बेकायदेशीररित्या शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत बांधली.हा गैरप्रकार सर्वप्रथम सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांच्या निदर्शनास आली.देवढे पाटील यांनी या प्रकरणाची तक्रार येथील जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.त्यानंतर त्यांनी मंत्रालयापर्यंत पाठपुरावा सुद्धा केला.या प्रकरणाबाबत दिवंगत आमदार विनायकराव मेटे यांनी विधानसभेत लक्षवेधी प्रश्न उपस्थित करून 'या' अतिक्रमणाकडे शासनाचे लक्ष वेधले होते.तरीही वाशीमच्या महसूल प्रशासनाने 'या' अतिक्रमणाला 'राजाश्रय' देवून आजपर्यंत ते अतिक्रमण काढण्यासाठी आणि ती कोट्यवधीची जागा शासनाच्या ताब्यात घेण्यासाठी पुढाकारच घेतला नसल्याचा आरोप सुभाष देवढे यांनी केला आहे.

राज्याचे विद्यमान कर्तव्यदक्ष महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास 'ही' गंभीरबाब आणून देवून महसूल प्रशासनाचा नाकर्तेपणाही उघडकीस आणून दिला आहे.देवढे पाटील यांचा या प्रकरणात शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.आता 'हे' अतिक्रमण महसूल प्रशासन काढण्यासाठी केव्हा मुहूर्त काढणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.




## महावितरणला ग्राहक तक्रार निवारण आयोगाचा दणका ; चुकीचे वीजबिल रद्द

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

पंतप्रधान हर घर मुक्त वीज योजनेअंतर्गत सौरऊर्जा प्रकल्प उभारलेल्या ग्राहकाला महावितरणने तब्बल १७ हजार रुपयांचे वीजबिल पाठविल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी वाशिम जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने महावितरणच्या कारभारावर ताशेरे ओढत चुकीचे वीजबिल रद्द करण्याचे आदेश बुधवारी दिले. तसेच संबंधित ग्राहकाला १५ हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत.




रिसोड येथील प्राचार्य डॉ. विजय तुरुकमाने यांनी जानेवारी २०२५ मध्ये सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून तीन किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारला. या प्रकल्पातून आतापर्यंत सुमारे साडेसात हजार युनिट वीज निर्मिती झाली असून, त्यापैकी केवळ साडेचार हजार युनिट वीज वापरण्यात आली आहे.असे असतानाही महावितरणने त्यांना १७ हजार रुपयांचे वीजबिल पाठविले. या बिलाविरोधात डॉ. तुरुकमाने यांनी ॲड. हिरामण मोरे यांच्या माध्यमातून वाशिम जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे दाद मागितली. प्रकरणातील कायदेशीर बाबींची पडताळणी केल्यानंतर आयोगाने ग्राहकाच्या बाजूने निकाल दिला. चुकीचे वीजबिल रद्द करण्यासोबतच ग्राहकाला १५ हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश महावितरणला देण्यात आले. या निर्णयामुळे सौरऊर्जा प्रकल्पधारक ग्राहकांना दिलासा मिळाला असून, महावितरणच्या वीजबिल प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## महिलेच्या विनयभंग प्रकरणी आरोपीस एक वर्ष सश्रम कारावास

### मंगरूळपीर न्यायालयाचा निकाल; ३ हजार रुपये दंड, रक्कम पीडितेस देण्याचे आदेश

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

महिलेच्या विनयभंगाच्या प्रकरणात आरोपी संदीप सुधाकर वायले यास दोषी ठरवत मंगरूळपीर न्यायालयाने एक वर्ष सश्रम कारावास आणि ३ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम पीडितेस देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले. हा निकाल १३ ऑगस्ट रोजी सुनावण्यात आला.

प्राप्त माहितीनुसार, १ ऑक्टोबर २०२० रोजी पीडिता व तिचे पती दिवसभर शेतात सोयाबीन सोंगणीचे काम करून सायंकाळी घरी परतले होते. त्यानंतर पीडितेचे पती सोयाबीनची गंजी झाकण्यासाठी शेतात गेले असता, रात्री सुमारे ८ वाजता आरोपी संदीप सुधाकर वायले हा पीडितेच्या घरी आला. आरोपीने पीडितेशी अश्लील व अयोग्य शब्दांत बोलून वाईट उद्देशाने तिचा हात धरल्याचे फिर्यादीत नमूद आहे.पीडितेने आरोपीचा हात सोडवून त्याला तेथून निघून जाण्यास सांगितले तसेच हा प्रकार पतीला सांगणार असल्याचे बजावले. त्याचवेळी पीडितेचे पती घरी परतल्याचे पाहून आरोपी तेथून पळून गेला. त्यानंतर पीडितेने पतीला घडलेला प्रकार सांगून मंगरूळपीर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून आरोपीविरुद्ध कलम ३५४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणाचा तपास ए.एस.आय. अनिरुद्ध भगत यांनी पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.



न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान पाच साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. साक्षीदारांचे जबाब व उपलब्ध पुराव्यांच्या आधारे. एस. डी. तारे, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्रमांक २, मंगरूळपीर यांनी आरोपी संदीप सुधाकर वायले यास कलम ३५४ भादंवि अंतर्गत दोषी ठरविले.न्यायालयाने आरोपीस एक वर्ष सश्रम कारावास आणि ३ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली असून दंडाची रक्कम पीडितेस देण्याचे आदेश दिले आहेत.

सरकार पक्षातर्फे सरकारी वकील . विजय डी. आरु यांनी सहायक संचालक . आनंद नरखेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली काम पाहिले. पीडितेस न्याय मिळवून देण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी . विशाल क्षिरसागर, पोलीस निरीक्षक किशोर शेळके, ; पैरवी अधिकारी ए.एस.आय. ज्योती डोंगरदिवे तसेच पोलीस शिपाई विशाल फुफुटे व सरुबाई हिंगमिरे यांचे सहकार्य लाभले.

# सोयाबीनवरील लष्करी अळीच्या प्रादुर्भाव !

***कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांकडून पाहणी**
***वारंगी येथे शेतकऱ्यांना एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन**

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

मौजा वारंगी, ता. मालेगाव येथे सोयाबीन पिकावरील लष्करी अळी व इतर पाने खाणाऱ्या किडींच्या प्रादुर्भावाची आज कृषी विज्ञान केंद्र, वाशिमच्या शास्त्रज्ञांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी केली.

यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे, पीक संरक्षण विषय तज्ज्ञ श्री. आर. एस. डवरे तसेच कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. डी. एन. इंगोले उपस्थित होते. कृषी विभागाच्या वतीने मंडळ कृषी अधिकारी प्राजक्ता कुचेकर व अमोल तांबे यांनी सहभाग घेतला. तसेच प्रगतिशील शेतकरी राजकुमार दहात्रे, उमेश दहात्रे, दत्तराव बर्वे, संतोष बोरचाटे, हरीश वाथे, सुमित चौधरी व संतोष दहात्रे यांची उपस्थिती होती. शास्त्रज्ञांनी प्रगतिशील शेतकरी राजकुमार दहात्रे यांच्या सोयाबीन प्रक्षेत्रासह परिसरातील इतर शेतांची प्रत्यक्ष पाहणी करून किडींची अवस्था, प्रादुर्भावाची तीव्रता व पिकाची वाढ यांचे निरीक्षण केले. पाहणीदरम्यान उंटअळी (एस्-त्ददजे)



तसेच तंबाखूची पाने खाणारी अळी (Spodoptera litura) यांचा तुरळक प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला. सद्यस्थितीत प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले.

यावेळी शेतकऱ्यांना एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) अंतर्गत नियमित पीक निरीक्षण, कामगंध सापळ्यांचा (Pheromone traps) वापर, पक्षी थांबे (Bird perches) उभारणे, अंडीपुंज व लहान अळ्यांचे यांत्रिक पद्धतीने नियंत्रण, तसेच आवश्यकतेनुसार वनस्पतीजन्य कीटकनाशकांचा वापर याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच किडीची आर्थिक नुकसान पातळी (Economic Threshold Level – ETL) ओलांडल्यानंतरच सोयाबीनसाठी लेबलवर मंजूर व शिफारशीत कीटकनाशकांची योग्य मात्रा व योग्य फवारणी तंत्राने वापर करावा, असा वैज्ञानिक सल्ला शेतकऱ्यांना देण्यात आला. अनावश्यक व प्रतिबंधात्मक रासायनिक फवारण्या टाळून कीटकनाशकांच्या प्रभावी गटांची फेरपालट करणे, जैविक व वनस्पतीजन्य उपायांना प्राधान्य देणे आणि परागीभवन करणारे तसेच उपयुक्त कीटकांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

किडीचा प्रादुर्भाव दिसताच घाबरून रासायनिक फवारणी न करता प्रथम प्रादुर्भावाची तीव्रता तपासा आणि आर्थिक नुकसान पातळीच्या आधारेच शास्त्रीय पद्धतीने नियंत्रण करा असा संदेश कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिला.

# दापुरी कालवे येथील रस्त्यासाठी भारतीय दलित पँथरचा एल्गार;

## अशोक कांबळे यांचे आमरण उपोषण सुरू

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील दापुरी कालवे येथील दलित वस्तीच्या मुख्य रस्त्याच्या दुरावस्थेविरोधात भारतीय दलित पँथर महाराष्ट्र राज्य संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. रस्त्यावर साचणाऱ्या चिखलामुळे गेल्या अनेक वर्षांपासून होणाऱ्या त्रासाला कंटाळून संघटनेचे कार्यकर्ते अशोक गोपाळ कांबळे यांनी आजपासून म्हणजेच १३ ऑगस्ट २०२६ पासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

गट ग्रामपंचायत सोनठाणा अंतर्गत येणाऱ्या दापुरी कालवे वार्ड क्र. ३ मधील दापुरी फाटा ते मारोती मंदिरापर्यंतचा रस्ता हा दलित वस्तीचा मुख्य मार्ग आहे. पावसाळ्यात या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल आणि पाणी साचते. त्यामुळे शाळकरी मुले, वृद्ध, रुग्ण आणि सर्वसामान्य नागरिकांना ये-जा करणे अशक्य झाले आहे. या प्रश्नी ग्रामपंचायत पदाधिकारी आणि प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. अखेर




अशोक कांबळे यांनी १० ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पंचायत समिती मालेगाव यांना लेखी निवेदन दिले. मात्र मागणी मान्य न झाल्याने त्यांनी आजपासून उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. या उपोषणाला गावातील नागरिक आणि दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी मोठा पाठिंबा दिला आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी होत आहे. उपोषणाच्या ठिकाणी शिरपूर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# खामगावात भाजपची भव्य तिरंगा रॅली

## राष्ट्रभक्तीचा जयघोष कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या नेतृत्वात उत्स्फूर्त सहभाग



प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**खामगाव :** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या बतीने गुरुवारी (१३ ऑगस्ट) खामगावात भव्य तिरंगा मोटरसायकल रॅली काढण्यात आली. राज्याचे कामगार मंत्री तथा खामगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार ॲड. आकाश फुंडकर यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या रॅलीत भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि राष्ट्रभक्त नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. 'विजयी विश्व तिरंगा प्यारा, झंडा ऊँचा रहे हमारा' या घोषणांनी शहराचा परिसर दुमदुमून गेला. सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथून रॅलीला प्रारंभ झाला. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर राजमाता जिजाऊ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून रॅली मार्गस्थ झाली. रॅलीदरम्यान सहभागींच्या हातात तिरंगा ध्वज फडकत होता. 'भारत माता की जय', 'बंदे मातरम' अशा घोषणांनी वातावरण राष्ट्रभक्तिमय झाले. भुसावळ चौक, अर्जुन जल मंदिर, जगदंबा चौक, श्रद्धा ज्वेलर्स, फरशी, भगतसिंग पुतळा, एकबोटे चौक आणि सकळकळे कॉम्प्लेक्स मार्गे रॅली भाजपा कार्यालयासमोर पोहोचली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करून तिरंग्याचा सन्मान राखण्याचा संदेश बावेळी देण्यात आला. स्वातंत्र्य, राष्ट्राभिमान आणि एकतेची भावना द्दढ करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचेही उपस्थितांनी सांगितले. भाजपा कार्यालयासमोर राष्ट्रगीताने रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीत भाजप नगराध्यक्षा अर्पणाताई सागर फुंडकर, नगरसेवक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते.

# 1 लाख 51 हजार 111 मोदकांच्या महानैवेद्यांची महाराष्ट्रातील 51 केंद्रांत निर्मिती!

## खामगावच्या मुख्य केंद्रातून १८ व १९ ऑगस्टला वितरण

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**खामगाव :** श्रद्धा, भक्तिचा महामिलाप असलेल्या लाखो मोदकांच्या नैवेद्याचे खामगावच्या मुख्य केंद्रातून वितरण १८ आणि १९ ऑगस्टला होणार आहे. शहरातील आदर्श नगरस्थित श्री गजानन महाराज उपासना परिवाराच्या पुढाकाराने एक लाख ५१ हजार १११ मोदकांचा महानैवेद्य तयार केला जात आहे. महाराष्ट्रातील ५१ केंद्रांवर त्याच्या निर्मितीला प्रारंभ झाला आहे, ज्यामुळे गजानन भक्त आध्यात्मिक धाग्यात बांधले जात आहेत. 'संत कार्यास काही देता, अगणित होते सर्वथा; एक दाणा टाकिता मेदिनीमध्ये, कणीस होते,' या संतवचनाच्या भावनेतून हा सेवायज्ञ सुरू असून राज्याच्या कानाकोपऱ्यातून निर्मित आणि संकलित महानैवेद्याचे पालखीतील वारकऱ्यांना वाटप केले जाणार आहे. संपूर्ण राज्यभरातून या सेवाकार्यात सहभागी झालेल्या सुवर्णा चव्हाण, संगीता फुंडकर, भारती पाटील (खामगाव), रुचिका चव्हाण (लाखनवाडा), ललित लवणकर (नागपूर), सुरेखा बोंडे (वरणगाव), आरती दावने (देऊळगाव राजा), विद्या सिसोदे (जामनेर), सारिका पैलागड (वरूड),

### ४ वर्षांपासून मोदकांचे वाटप

» एक लाख ५१ हजार १११ मोदकांच्या महानैवेद्यासाठी महाराष्ट्रातील ५१ केंद्रांवर निर्मिती सुरू झाली आहे. नागपूर येथील २१ केंद्रांसह विविध शहरांमध्ये भक्तांकडून मोदक तयार केले जात आहेत. खामगावच्या मुख्य संकलन केंद्रात १७ ऑगस्टपर्यंत मोदक जमा केले जाणार असून, १८ व १९ ऑगस्टला पालखीतील वारकऱ्यांना त्याचे वितरण होणार आहे. 'मोदक महानैवेद्य वर्ष ४' हा उपक्रम राज्यभरातील भक्ती, सेवा आणि संघभावनेचा अनोखा आध्यात्मिक सोहळा ठरत आहे.

वर्षा सावरकर (अमरावती), ललिता जुमळे (अमरावती), डॉ. श्रीधर कुलकर्णी (मिरज), विक्रम विश्वास फडके (भंडारा), उर्मिला सूर्यवंशी (बुलढाणा), जयश्री पदे (मंगरूळपीर), सुलभा रेडे (आकोट), प्रवीण कोकाटे (शेगाव), स्वाती दरेकर (पुणे), शितल मोहिते (कोल्हापूर), अश्विनी पाटील (जळगाव), आशिष शिरसागर (सोलापूर), श्रीरंग मापारी (चंद्रपूर), संतोषी चंदनकर, सत्यम चंदनकर आणि कैलास पवार (संभाजीनगर) यांच्यासह अनेक भक्तांचे योगदान लाभत आहे. गजानन महाराज उपासना परिवार, आदर्श नगर महिला मंडळ यांच्या सहभागातून मोदक महानैवेद्य हा उपक्रम राबविला जात आहे. प्रत्येक भक्ताच्या हातून तयार होणारा मोदक हा श्रींच्या चरणी अर्पण केलेली श्रद्धेची कणिका मानली जात असून, लाखो श्रद्धाकणिका एकत्र येऊन हा महानैवेद्य साकारत आहेत.

# श्री गजानन महाराजांची पालखी मंगळवारी खामगावात

## नॅशनल हायस्कूलच्या प्रांगणात मुक्काम

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**खामगाव :** आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे गेलेल्या शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानच्या पालखीचे परतीच्या प्रवासात मंगळवारी, १८ ऑगस्ट रोजी खामगाव शहरात आगमन होणार आहे. पालखीच्या स्वागतासाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, श्रींच्या दर्शनासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. मंगळवारी सकाळी हनुमान व्हिटॅमिन येथे श्रींची पालखी दाखल होणार असून, सकाळी ११ वाजता नगर परिक्रमेला प्रारंभ होईल.

**बुधवारी पहाटे शेगावकडे प्रस्थान**

पालखी वाल्मीक चौक, विकमसी चौक, कृषी उत्पन्न बाजार समिती, टिळक पुतळा, अर्जुन जल मंदिर, मेन रोड, जगदंबा चौक, महावीर चौक, मोहन चौक, फरशी, महावीर भवन, एचडीएफसी बँक आणि खामगाव अर्बन बँके समोरून मार्गस्थ होणार आहे. त्यानंतर श्री अरजण खिमजी नॅशनल हायस्कूलच्या प्रांगणात दुपारी ३ वाजताच्या सुमारास पालखी पोहोचेल. येथे भाविकांना श्रींचे दर्शन घेता यावे यासाठी पालखी मुक्कामी राहणार आहे. दरम्यान, बुधवार, १९ ऑगस्ट रोजी पहाटे ५ वाजता श्रींची पालखी खामगावहून शेगावकडे प्रस्थान करणार आहे. या पवित्र सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्री गजानन महाराजांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुटाळपुरा येथील श्री गजानन अवलिया महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# लाखनवाडा येथील पुलावर चौघांचा धुडगूस

## तरुणाला बेदम मारहाण, आईशी गैरवर्तनाचा प्रयत्न

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**खामगाव :** दुपारी झालेल्या वादाचा राग मनात ठेवून लाखनवाडा पुलावर तरुणाला रोखून बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी या घटनेदरम्यान त्याच्या आईशी गैरवर्तन करण्याचा गंभीर प्रयत्न झाल्याचीही माहिती मिळाली आहे. हिवरखेड पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमातील विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, इरुचंद बोंदा भोसले (३५, रा. दधम, ता. खामगाव) हे आपल्या आई निर्मलाबाई यांच्यासह लाखनवाडा येथून दधमकडे जात असताना या घटनेला सामोरे गेले. पुलाजवळ ईश्वर चव्हाण, गोपाल चव्हाण, नितेश चव्हाण आणि संदीप राठोड (सर्व रा. दधम) यांनी त्यांना अडवून मारहाण केली. सकाळी झालेल्या वादाचा जाब विचारत आरोपींनी इरुचंद यांच्या डोक्यावर, हातावर आणि पाठीवर जबर मारहाण केली. याचवेळी, आरोपींनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप तक्रारीत आहे. तक्रारीतील तथ्ये आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे हिवरखेड पोलिसांनी कलम ७४, ७५, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१ (२) (३), ३(५) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमातील कलम ३ (१) (2) (द्ब) (द्बद्ब), ३ (२) (व्हीए), ३(१) (आर) (एस) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील करीत आहेत. घटनास्थळी सपोनी संदीप पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली. गुन्ह्याच्या अनुषंगाने ई-साक्षदेखील गोळा करण्यात आली आहे.

# खामगाव बसस्थानकासमोर रुग्णवाहिकेलाही वाट मिळेना

## बसस्थानकासमोर अर्ध्या रस्त्यावर ऑटो राहतात उभे

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**खामगाव :** शहरातील मध्यवर्ती बसस्थानका समोरील रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. रस्त्याच्या अर्ध्या भागावर उभ्या असलेल्या ऑटोमुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत असून, अतिक्रमणामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. विशेषतः, या कोंडीत रुग्णवाहिका अडकत असल्याने एकूणच रुग्णांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बसस्थानक परिसरात बस, ऑटो, दुचाकी, चारचाकी आणि पादचाऱ्यांची मोठी वर्दळ असते; परंतु वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी कोणतीही आवश्यक उपाययोजना दिसून येत नाही. ऑटोचालक रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने उभी करून रस्त्याचा मोठा भाग व्यापतात. त्यातच दुकानदारांची अतिक्रमणामुळे परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिकेला मार्ग मिळत नाही. रस्त्यावर थांबलेल्या ऑटोवर कारवाई, अतिक्रमण हटवणे, स्वतंत्र ऑटो थांब्याची जागा निश्चित करणे आणि दंडात्मक कारवाई करणे गरजेचे असल्याची अपेक्षा आहे.

**पोलिसांचे दुर्लक्ष**

बसस्थानका समोरील वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिकेची चाकेच थांबण्याची वेळ आली आहे. काही मिनिटांचा विलंबही रुग्णासाठी जीवनदान ठरू शकतो. केवळ अधूनमधून होणाऱ्या कारवाई करून फोटो काढण्याऐवजी, प्रशासनाने रस्त्यावर कायमस्वरूपी शिस्त लावावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करणे गरजेचे**

बसस्थानक परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्याकरिता प्रशासनाने तातडीने संयुक्त मोहीम आखावी

# रेल्वे पोलिसांच्या तत्परतेमुळे प्रवाशाचा गहाळ झालेला 16 हजारांचा मोबाईल परत

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**शेगाव :** अमरावती–पुणे एक्स्प्रेसने प्रवास करणाऱ्या प्रवाशाचा प्रवासादरम्यान गहाळ झालेला सुमारे १६,०००/- किमतीचा ह्क्कक्क्कह्ल कंपनीचा मोबाईल फोन रेल्वे पोलिसांच्या तत्परतेमुळे शोधून काढण्यात आला असून तो संबंधित प्रवाशाच्या नातेवाईकाच्या ताब्यात सुरक्षितपणे देण्यात आला आहे. दि. ०८/०८/२०२६ रोजी रमेश पवार, रा. महेंद्र कॉलनी, अमरावती हे अमरावती–पुणे एक्स्प्रेसने प्रवास करीत असताना त्यांचा काळ्या रंगाचा ह्क्कक्क्कह्ल कंपनीचा मोबाईल फोन प्रवासादरम्यान गहाळ झाला. सदर मोबाईलची अंदाजे किंमत ₹१६,०००/- असल्याचे त्यांनी सांगितले. मोबाईल गहाळ झाल्याची माहिती मिळताच रेल्वे पोलीस ठाणे शेगाव येथील ॒रस्ढ्ढ/८६ रेखा वानखेडे व पोहवा/५८४ मोहिते यांनी तत्काळ परिसरात मोबाईलचा शोध घेण्यास सुरुवात केली. शोध घेत असताना सदर वर्णनाचा मोबाईल रेल्वे किमी क्र. ५४७/२१-२३ जवळ मिळून आला. सदर मोबाईल ताब्यात घेऊन पोहवा/१२५ डाबेराव यांच्याकडे जमा करण्यात आला. त्यानंतर मोबाईलवर आलेल्या क्रमांकावर संपर्क साधून चौकशी केली असता सदर मोबाईल हा रमेश पवार यांचाच असल्याची खात्री झाली. रमेश पवार हे कामानिमित्त बाहेरगावी असल्याने त्यांनी त्यांचा मुलगा अवि रमेश पवार यास रेल्वे पोलीस ठाणे शेगाव येथे पाठविले. दि. १०/०८/२०२६ रोजी आवश्यक ती खात्री करून सदर मोबाईल अवि रमेश पवार यांच्या ताब्यात सुरक्षितपणे देण्यात आला.रेल्वे पोलिसांच्या तत्परता, कर्तव्यनिष्ठा व संवेदनशीलतेमुळे प्रवाशाचा गहाळ झालेला मौल्यवान मोबाईल अल्पावधीत शोधून काढून परत करण्यात आला. या कार्यवाहीबद्दल संबंधित प्रवाशाने रेल्वे पोलिसांचे आभार मानले. सदर कार्यवाही विवेकानंद राळेभात, प्रभारी अधिकारी, रेल्वे पोलीस ठाणे शेगाव यांच्या मार्गदर्शनाखाली ॒रस्ढ्ढ/८६ रेखा वानखेडे, पोहवा/५८४ मोहिते व पोहवा/१२५ डाबेराव* यांनी तत्परतेने केली.

# तुरीच्या दरात 100 रुपयांची झाली वाढ

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**खामगाव :** मागील काही दिवसांपासून स्थिर असलेल्या तुरीच्या दरात बुधवारी, १२ ऑगस्ट रोजी काही प्रमाणात वाढ झाली. खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तुरीच्या दरात प्रति क्विंटल १०० रुपयांची वाढ नोंदविण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. बाजार समितीमध्ये १२ ऑगस्ट रोजी चांगल्या प्रतीच्या तुरीला कमाल ८ हजार २२५ रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला. गेल्या काही दिवसांपासून तुरीच्या दरात विशेष चढ-उतार नसल्याने शेतकऱ्यांचे बाजारभावाकडे लक्ष लागले होते. बुधवारी दरात झालेल्या वाढीमुळे बाजारात काही प्रमाणात सकारात्मक वातावरण निर्माण झाले. तुरीच्या आवकेनुसार तसेच बाजारातील मागणी आणि गुणवत्तेनुसार दरात फरक पडत आहे. चांगल्या प्रतीच्या तुरीला तुलनेने अधिक भाव मिळत आहे. दरातील ही सुधारणा आगामी काळात कायम राहते का, याकडे शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे

**तुरीचे भाव पोहोचले 8,225 रुपयांवर**

# विशेष सखोल पुनरिक्षणांतर्गत मतदार याद्या प्रसिध्द

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**बुलढाणा :** भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार बुलढाणा जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील एकूण २० लाख ८९ हजार ९६५ मतदारांना गणनापत्रकांचे वाटप करून त्यांचे डिजिटायझेशन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. बुलढाणा जिल्ह्यातील एकही पात्र मतदार मतदारयादीत नाव येण्यापासून वंचित राहू नये, या उद्देशाने ११ ऑगस्ट २०२६ रोजी भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत ERO Net प्रणालीवरून मृत मतदार, गैरहजर मतदार, कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार, इतर मतदार तसेच मतदार यादीमध्ये यापूर्वीच समाविष्ट झालेले मतदार यांची विधानसभा मतदारसंघनिहाय यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी बुलढाणा जिल्ह्याच्या https://buldhana.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिक, मतदार, मृत, गैरहजर व कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांसह अन्य प्रवर्गांची यादी संकेतस्थळावर विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी लोकप्रतिनिधींनी व संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीची सखोल पाहणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. एखाद्या पात्र मतदाराचे नाव अनावधानाने यादीत आलेले नसल्यास किंवा मतदाराचा अचूक पत्ता आढळून आल्याने संबंधित BLO यांनी त्या मतदारास Uncollectable न उपलब्ध वर्गवारीत समाविष्ट केले असल्यास, अथवा मतदाराने गणनापत्रक आपले संबंधित BLO यांच्याकडे जमा केले नसल्यामुळे त्यांचे नाव वरील यादीत समाविष्ट झाले असल्यास, संबंधित मतदारांनी तत्काळ आपल्या क्षेत्रातील BLO यांच्याशी संपर्क साधावा. तसेच गणनापत्रकाचे Roll-back करून योग्य तपशीलासह ते पुन्हा भरून द्यावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जिल्ह्यातील एकही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही, यासाठी सर्वांनी मतदार यादीची पडताळणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. तसेच बुलढाणा जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली मतदार यादी QR Code Google Lens द्वारे स्कॅन करून मोबाईलवरही सहज पाहता येईल.

# पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांचा सुधारित जिल्हा दौरा

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**बुलढाणा :** राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे गुरुवार १३ ते १५ ऑगस्ट रोजी ३ दिवसीय बुलढाणा दौऱ्यावर येत आहे. दौऱ्यादरम्यान पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयाचा आढावा, पुरस्कार सोहळा, विविध विकास कामाचे लोकार्पण तसेच स्वातंत्र्य दिनाच्या शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित राहणार आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार गुरुवार १३ ऑगस्ट रोजी मुंबई येथून बुलढाणा येथे आगमन व शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे राखीव. शुक्रवार १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता अभ्यांगतांसाठी राखीव. दुपारी १२ वाजता गुंतवणूक परिषद बैठकीस उपस्थिती. दुपारी १ वाजता जिल्हा परिषद येथेसी. ई. ओ. संग्रामअभियान पुरस्कार सोहळाला उपस्थिती. दुपारी २ वाजता मौजे सागवण ता. बुलढाणा येथे विविध विकास कामांचे भुमीपूजन व लोकार्पण कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विषयाच्या आढावा बैठकीस उपस्थिती. सायंकाळी ५.३० वाजता मोताळा येथील स्व. मोबीन अहेमद, माजी जिल्हाध्यक्ष अल्पसंख्यांक सेल यांचे निवासस्थानी सांत्वनपर भेट. रात्री ८ वाजता शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे नगरपरिषद, मोताळा नगरसेवक व पदाधिकारी यांचे सोबत बैठक. शनिवार १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण कार्याक्रमाला उपस्थिती. सकाळी १०.३० वाजता कार्यालय येथे जिल्हास्तरिय एकात्मिक आरोग्य वर्धिनी जिल्हाधिकारी समितीची सभा. दुपारी १ वाजता मौजे मासरूळ ता. बुलढाणा येथील विकास कामांचे लोकार्पण व कार्यकर्ता मेळावा. दुपारी ३ वाजता सातगाव म्हसला ता. बुलढाणा येथे सामाजिक सभागृहाचे लोकार्पण. सायंकाळी ४ वाजता मौजे अमडापूर ता. चिखली येथे विविध विकास कामांचे लोकार्पण व संवाद मेळावा. त्यानंतर साईनुसार साताराकडे प्रयाण करतील.

# पिकविम्यांसाठी कृषीअधिकारी कार्यालयात ठिय्या

## अतिवृष्टीची मदत मिळते मग पिकविमे नामंजूर कसे-पांडुरंग पाटील

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**मेहकर :** खरीप २०२५ च्या हंगामात मेहकर-लोणार ह्या दोन तालुक्यांसहीत संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात विक्रमी अतिवृष्टी झाली होती. त्यावेळी शेतकऱ्यांना त्यातुन बाहेर काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खुप मोठे पॅकेज जाहीर करत सर्वच शेतकर्यांना हेक्टरी १७५०० रुपये विमे जाहीर केले होते. परंतु प्रत्यक्षात जिल्ह्यातील २०२५ खरीपचे सर्वच शेतकऱ्यांचे विमे नामंजूर करन्यात आले.

सदर बाब उपस्थित करत संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष पांडुरंग पाटील यांच्या नेत्रुत्वात शेतकरी कृषीअधिकारी कार्यालय मेहकर येथे जाब विचारन्यासाठी एकवटले होते. जिल्हा कृषी अधिकारी संतोष डाबरे यांना फोनवरून चर्चा करत पाटील यांनी जिल्हा प्रशासनातर्फे मागील वर्षांतील नापिकीचा अहवाल वरीष्ठ पातळीवर पाठवन्याची विनंती केली. त्यावर मेहकर तालुक्याचा तहसीलदार निलेश मडके व कृषीअधिकारी किशोर काळे यांनी वरिष्ठांकडे पाठविणार असल्याचे सांगितले. तसेच जिल्हा कृषी अधिकारी यांनीही आम्ही जिल्ह्याचा लवकरच वरिष्ठ पातळीवर सादर करु असे आश्वासन दिले. याचसोबत खरीप २०२४ चे पोर्टलवर दिसलेली रक्कम आता शुन्य झाली यावरही पाठपुरावा करण्यात आला. त्याविषयी लवकरच राज्य व केंद्र शासन एक संयुक्त बैठक लावुन योग्य कारवाई करणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याविषयी आयुक्त कार्यालयाला सादर केलेले पत्र पुराव्यादाखल पाटील यांना दाखवण्यात आले. याचबरोबर २०२३ व २४ मधील प्रलंबीत पिकविम्यांची संपूर्ण आकडेवारी व यादी लवकर जाहीर करावी अशीही मागनी करण्यात आली. प्रसंगी कंपनीचे जिल्हा प्रतिनीधी उपस्थित नसल्याने त्यांचेवर कारवाई करण्यात यावी अशी भुमिका पाटील यांनी घेतली. कंपनीच्या मुंबई येथील व्यवस्थापकीय पातळीवरील अधिकारी यांचेशी फोनवरून पाठपुरावा करण्यात आला. तसेच आज केवळ जाब विचारायला आलो परंतु लवकरच शेतकर्यांना न्याय न मिळाल्यास व्यापक व तिव्र आंदोलन उभारण्यात येईल. व त्यातुन उदभवणाऱ्या कायदा सुव्यवस्थितेस स्वतः मुख्यमंत्री जबाबदार राहतील असे निवेदन मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हासोशल मिडीया प्रमुख सुनिल वाघमारे, ता. कार्याध्यक्ष नितीन वैराळ, ता. संघटक भागवत दिघडे, भागवत बाजड, ता. उपाध्यक्ष सुनिल बोबडे, धनंजय वैराळ, संजय सरोदे, किसन भालेराव, संजय ठोकरे, नरेश ढगे, गजानन वैराळ, संतोष खरात, शंकर पवार आदींसहीत परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. अधिक व्यापक स्वरूपात लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# तीन महात्म्यांच्या अलौकिक भक्तीचा 'अद्दश्य संगम'

प्रतिनिधी १४ ऑगस्ट

**सिंदखेड राजा:** आपल्या कर्मातच ईश्वर शोधून 'कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी' असा भक्तीचा महामंत्र जगाला देणारे कर्मयोगी संत सावता महाराज, संत गजानन महाराज आणि भूतलावरील देव पांडुरंग परमात्मा या तीन अलौकिक महात्म्यांच्या भक्तीचा एक अद्दश्य आणि पवित्र संगम बुधवारी सिंदखेडराजा नगरीत अवतरला. पंढरपूरहून विठुरायाच्या चरणी नतमस्तक होऊन परतीच्या प्रवासाला निघालेली श्री संत गजानन महाराजांची पालखी संत सावता महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशीच गेल्या ५७वर्षांपासून याच मुहूर्तावर शहरात दाखल होते. हा केवळ योगायोग नसून, भक्तीच्या असीम ताकदीची प्रचिती देणारा एक अलौकिक योग मानला जात आहे.

गेल्या ५७ वर्षांपासून ही अखंड परंपरा अशीच अविरतपणे सुरू आहे. 'कर्म हीच पूजा' आणि भक्तीचा अनोखा योग संत सावता महाराजांनी शेतात राबत असतानाच विठ्ठलाचे रूप पाहिले. त्यांनी कर्म हीच ईश्वरपूजा मानली. म्हणूनच पंढरीच्या वारीत विठूरायाची पालखी जशी आरण येथील संत सावता महाराजांच्या जन्मस्थळी जाते, अगदी त्याच भावनेने श्री संत गजानन महाराजांचा पालखी सोहळा गेल्या अर्ध्या शतकाहून अधिक काळापासून सावता महाराजांच्या पुण्यतिथीला सिंदखेडराजात विसावतो. दोन महिन्यांचा प्रदीर्घ पायी प्रवास, पंढरपुरातील विठ्ठल दर्शन आणि त्यानंतर परतीचा मार्ग... या प्रवासात शहरात आगमन झाल्यावर गजानन महाराजांच्या पालखीने शहरातील संत सावता महाराज मंदिरास भक्तिभावाने प्रदक्षिणा घातली.
































हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135